पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक
सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला
• वर्ष १६ • अंक ७७ • मंगळवार, दि. २२सप्टेंबर २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८
RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewsuperfast.com







## »थोडक्यात

### ध्वनीप्रदूषणाची न्यायालयाकडून दखल

मुंबई. काही जणांकडून निर्माण केल्या जाणाऱ्या अशा आक्षेपार्ह ध्वनी व वायुप्रदूषणामुळे निरपराध नागरिकांना त्रास सहन करावा लागू नये,' असे खंडपीठाने नमूद केले. 'ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्याच्या दृष्टीने विशिष्ट मर्यादित आवाजालाच परवानगी देणारे यापूर्वीचे न्यायालयीन आदेश असूनही काही जणांकडून लाऊडस्पीकर व ॲम्प्लीफायरचा वापर केला जात आहे.

---

### आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला पहिले गोल्ड

**निशिन, जपान :** भारतीय महिला क्रिकेट संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकले आहे. मंगळवारी झालेल्या अंतिम सामन्यात संघाने श्रीलंकेचा १४७ धावांनी पराभव केला. या संघाला २०२२ च्या स्पर्धेतही सुवर्णपदक मिळाले होते. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, भारताने ३ गडी गमावून २१६ धावा केल्या. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला संघाने नोंदवलेली ही आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या आहे. २१७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना, श्रीलंकेचा संघ १५.४ षटकांत ६९ धावांत सर्वबाद झाला. भारताकडून स्मृती मानधनाने ७९ धावा केल्या, रिचा घोष ४९ धावांवर नाबाद राहिली आणि शफाली वर्माने ४८ धावांची खेळी केली. मानधना आणि शफाली यांनी पहिल्या विकेटसाठी ९९ धावांची भागीदारी केली.

# गणेशोत्सवावर पाणी टंचाईचे सावट, मुर्तींचे जतन करणार!

## जलव्यवस्थापनात नवा आदर्श घडवण्याचे आवाहन



प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अकोला:** राज्यात आणि विशेषतः अकोला शहरात सध्या लाडक्या बाप्पाच्या आगमनाची आणि गणेशोत्सवाचा उत्साह आहे. अशातच शहरासमोर निर्माण झालेली पाणीटंचाईची परिस्थिती ही जलसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारी एक सुवर्णसंधी ठरत आहे. यंदाच्या गणेशोत्सवात पाण्याचा योग्य ताळेबंद राखत, पारंपरिक उत्साहाला पर्यावरणपूरक आणि शिस्तबद्धतेची जोड देत गणेश विसर्जन सोहळा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्याबाबत प्रशासन आणि गणेश मंडळे सज्ज झाली आहेत. काही मंडळांनी गणेशोत्सवासाठी आणलेली भव्य मुर्ती ही जपून ठेवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे. ज्या ठिकाणी अकोलेकर मोठ्या गणेश मुर्ती परंपरागत पध्दतीने विसर्जित करतात त्या ठिकाणी पाण्याचा अभाव समोर आल्याने अनेक मंडळे हे मुर्तीचे विसर्जन टाळत गणेशमुर्तीची जपवणूक करण्यासाठी पुढाकार घेत आहे.



### बाळापूर गणेश घाटाची पाहणी

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्याकडून बाळापूर गणेश विसर्जन घाटाची पाहणी करण्यात आली. त्यांनी शिमला हॉटेलजवळील पूल, भिकुंड नदीघाट आणि बाळापूर शहरामधील मन नदीवरील विसर्जन घाटावरील सुरक्षा, प्रकाश व्यवस्था, व वाहतूक नियोजनाचा आढावा घेतला.यावेळी महापालिका आयुक्त, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन, तहसीलदार तसेच इतर अधिकारी उपस्थित होते. उत्सव शांततेत व सुरक्षित पार पाडण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे.



### पर्यावरणपूरक विसर्जन आणि प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मुर्तींचे जतन

पाण्याचा ताण आणि जल प्रदूषण रोखण्यासाठी यावर्षी गणेशोत्सवात पर्यावरणपूरक उपक्रमांना प्राधान्य दिले जात आहे. मोर्णा नदीकाठ व गणेश घाट: महापालिकेच्या वतीने मोर्णा नदीकाठावरील गणेश घाटावर कृत्रिम छोटे कुंड तयार करण्यात आले असून, लहान मूर्तींचे विसर्जन याच सुलभ कुंडात करण्याचे आवाहन केले जात आहे. यामुळे पाण्याचा अपव्यय टळणार असून नद्यांचे प्रदूषणही रोखता येईल. शहरातील मोठ्या आणि प्रसिद्ध गणेश मंडळांच्या 'प्लॅस्टर ऑफ पॅरिस' च्या भव्य मूर्तींचे विसर्जन थेट कोरड्या पात्रात शक्य नसल्याने त्या मूर्तींचे जतन करून पुढील वर्षी पुन्हा प्रतिष्ठापना करण्याचा किंवा सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचा सकारात्मक पर्याय पुढे येत आहे. गांधीग्राम पुलाजवळ पूर्णा नदीपात्रात पाण्याची स्थिती पाहता, यावर योग्य तो पर्यायी निर्णय मंडळे स्वतःहून घेत आहेत.

### गणेश मंडळांचा ऐतिहासिक पुढाकार व प्रशासकीय सहकार्य

अकोल्याची गणेशोत्सवाची परंपरा ही नेहमीच सामाजिक ऐक्याची आणि शिस्तीची राहिली आहे. यंदा पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व प्रमुख गणेश मंडळांनी स्वतःहून पुढाकार घेतला आहे. विसर्जन मिरवणुकीत पाण्याचा अतिवापर टाळणे, वाजत-गाजत साधेपणाने परंतु जल्लोषात उत्सव साजरा करणे आणि मूर्ती विसर्जनाबाबत पर्यायी पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन मंडळांद्वारे केले जात आहे. जिल्हा प्रशासन आणि महापालिका देखील यासंदर्भात सर्व गणेश मंडळांशी समन्वय साधून सहकार्य करत आहेत. सरकार आणि प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या मूर्तींचे जतन करण्यासाठी विशेष पावले उचलण्याची गरज आहे. अकोलेकर जनता व तरुण वर्ग या संकटाचे रूपांतर एका सुंदर उपक्रमात करून राज्यासमोर एक आदर्श निर्माण करतील यात शंका नाही.

### पाणीटंचाईचे आव्हान आणि सकारात्मक उपाययोजना

शहरात सध्या उपलब्ध असलेल्या जलसाठ्याचा विचार करता, नागरिकांना पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावे यासाठी जलव्यवस्थापनाचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून, आठ ते दहा दिवसाआड होणारा पाणीपुरवठा लक्षात घेता महापालिका प्रशासन, नागरिक आणि गणेश मंडळे यांनी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आधीपासूनच कंबर कसली आहे. पुढील काही दिवसात शहराचा पाणी पुरवठा हा १५ दिवसातून एकदाच होण्याची शक्यता वाढली आहे.

# मेथीच्या भाजीने विद्यार्थ्याला दंड!

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**मुंबई :** मुंबईच्या भाईंदर येथील तपोवन विद्यालयामध्ये एका विद्यार्थ्याने जेवणाच्या डब्यात मेथीची भाजी आणल्याबद्दल शाळेने त्याच्याकडून ५० रुपये दंड आकारल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेची गंभीर दखल घेत मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने संबंधित शाळेला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. 'पर्युषण पर्व २०२६' च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आहारावर अशा प्रकारचे निर्बंध लादले गेल्याने सध्या या मुद्द्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी रॉबर्ट डिसोझा यांनी पालिकेकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या आरोपानुसार, या शाळेत बहुतांश विद्यार्थी जैन समाजातील असल्याने, प्रवेशाच्या वेळीच पालकांना मुलांच्या डब्यात मांसाहारी पदार्थ किंवा कंदमुळे न देण्याच्या सक्त सूचना दिल्या जातात. याच नियमांच्या आडून शाळेने डब्यात मेथीची भाजी आणणाऱ्या विद्यार्थ्यावर ही दंडात्मक कारवाई केली असून, या मनमानी कारभारामुळे पालकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या तक्रारीची गंभीर दखल घेत मीरा-भाईंदर महापालिकेच्या शिक्षण विभागाने तपोवन विद्यालयाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. विद्यार्थ्यांना डब्यात कोणते अन्नपदार्थ आणावेत यावर निर्बंध लादण्याचा आणि विशिष्ट पदार्थ आणल्यास दंड आकारण्याचा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे पालिकेने नोटिशीत म्हटले आहे. अशा प्रकारच्या कृतीमुळे विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांसह शिक्षणाच्या अधिकाराशी (आरटीई) संबंधित नियमांचे थेट उल्लंघन होत असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. शाळेत मेथीची भाजी आणण्यास मनाई असल्याने, विद्यार्थ्याला कॅन्टीनमधून दुसरी भाजी देण्यासाठी ५० रुपये आकारण्यात आल्याचे स्पष्टीकरण तपोवन विद्यालयाने पालकांना दिलेल्या पत्रात दिले आहे. या प्रकाराविरुद्ध महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी रॉबर्ट डिसोझा यांनी तक्रार केल्यानंतर, शिक्षणाधिकारी सुलभा वटारे यांनी १८ सप्टेंबर रोजी शाळेला नोटीस बजावली. आरटीई कायद्यानुसार विद्यार्थ्यांवर असे जाचक नियम लादता येत नाहीत. यावर समाधानकारक खुलासा न केल्यास शाळेवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही शिक्षण विभागाने दिला आहे.

# महाराष्ट्रात शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाचे इलेक्शन जाहिर!

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**मुंबई :** महाराष्ट्रातील राजकीय वातावरणात आता शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकांमुळे मोठी रणधुमाळी पाहायला मिळणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील ५ महत्त्वाच्या शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीचा कार्यक्रम अधिकृतपणे जाहीर केला आहे. विधान परिषद निवडणुकीच्या या रिंगणात अमरावती, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद अर्थातच छत्रपती संभाजीनगर या प्रमुख विभागांचा समावेश आहे. एकीकडे दुष्काळ, पाणी टंचाईचे सावट असताना दुसरीकडे निवडणुका लागल्यात. त्यामुळे आरोप प्रत्यारोपालाही धार येईल. विधान परिषदेच्या या निवडणुकीत २३ ऑक्टोबर रोजी मतदान होईल. तर २७ ऑक्टोबर रोजी निकाल लागून पदवीधर आणि शिक्षकांचा कौल कोणाच्या बाजूने लागतो हे स्पष्ट होईल. या निवडणुकीसाठी अर्ज प्रक्रिया २९ सप्टेंबरपासून सुरू होईल. त्यामुळे या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. निवडणूक आयोगाच्या या घोषणेनंतर सर्वच राजकीय पक्षांनी आपापली मोर्चेबांधणी सुरू केली असून, इच्छुकांनी गणिते मांडायला सुरुवात केली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, या निवडणुकीसाठीची अर्ज प्रक्रिया २९ सप्टेंबर २०२६ पासून अधिकृतपणे सुरू होत आहे. इच्छुकांना ६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत आपले उमेदवारी अर्ज दाखल करता येतील.

### ५ जागांवर नवीन चेहरा की तोच जुना

महाराष्ट्रात मुदत संपणाऱ्या पाचही आमदारांचा कार्यकाळ अंतिम टप्प्यात आला आहे. यामध्ये औरंगाबाद पदवीधरचे सतीश चव्हाण, पुण्याचे अरुण लाड आणि नागपूरचे अभिजीत वंजारी या ३ पदवीधर प्रतिनिधींचा समावेश आहे. तर अमरावतीचे किरण सरनाईक आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत आसगावकर या २ शिक्षक प्रतिनिधींचाही कार्यकाळ संपत आहे. या ५ जागा रिक्त होत असल्याने सर्वच पक्षांत उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी रस्सीखेच पाहायला मिळणार आहे.

# अकोलेकरांच्या विकासाचा, प्रवास होणार सुकर!

## खासदार अनुप धोत्रे आणि आमदार रणधीर सावरकरांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**अकोला:** शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला एक नवी आणि आधुनिक दिशा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अकोलेकरांचे बहुप्रतिक्षित 'सिटी बस' सुरू होण्याचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरत असून, लवकरच शहराच्या रस्त्यांवर आकर्षक केशरी रंगाच्या आधुनिक ई-बसेस धावताना दिसणार आहेत. विधानसभा मुख्य प्रतोद तथा आमदार रणधीरजी सावरकर आणि अकोला लोकसभेचे खासदार अनुपजी धोत्रे यांच्या अथक पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वाकडे चालला आहे. शहरातील प्रदूषण कमी करणे आणि नागरिकांना अत्यल्प दरात सुरक्षित, सुलभ व अत्याधुनिक प्रवासाची सोय उपलब्ध करून देणे हा आमचा उद्देश आहे,' असे मत खासदार अनुप धोत्रे यांनी व्यक्त केले. तर, 'खासदार अनुप धोत्रे आणि महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी मिशन मोडवर येऊन अवघ्या काही काळातच हा प्रकल्प पूर्णत्वास नेला आहे,' अशी प्रतिक्रिया आमदार रणधीर सावरकर यांनी दिली. या विकासकामामुळे अकोलेकरांच्या दैनंदिन प्रवासाचा प्रश्न सुटणार असून, शहरवासीयांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत आहे.

**लवकरच धावणार आकर्षक 'ई-सिटी बस'!**

### प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेअंतर्गत अकोल्याला लाभ

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेअंतर्गत अकोला महानगरपालिकेस एकूण ४२ ई-बसेस प्राप्त होणार आहेत. यामध्ये १२ मीटर लांबीच्या १४ आणि ९ मीटर लांबीच्या २८ बसेसचा समावेश आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात २० अत्याधुनिक गाड्या अकोल्यात दाखल झाल्या आहेत. या सर्व बसेस वातानुकूलित (ए.सी.), प्रदूषणमुक्त आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या सुरक्षित सुविजेने सज्ज आहेत. तसेच, महिला, वरिष्ठ नागरिक, विद्यार्थी यांच्यासाठी विशेष सोयी आणि रुग्णांसाठी व्हीलचेअरची सुविधा यामध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### चार्जिंग स्टेशनची पाहणी आणि अंतिम टप्प्यातील कामे

नुकतीच दि. २१ सप्टेंबर रोजी खडकी येथील ई-बस चार्जिंग स्टेशनच्या कामाची खासदार अनुप धोत्रे आणि आमदार रणधीर सावरकर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी महापौर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, उपमहापौर अमोल गोगे आणि सभागृह नेता पवन महल्ले उपस्थित होते. चार्जिंग युनिट बसवण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, पुढील महिन्यात आरटीओची परवानगी प्रक्रिया पूर्ण करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते या ई-बस सेवेचा लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.

# हॉकर्स झोन भाजीविक्रेत्यांसाठी की वरली अड्ड्यासाठी ?

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

अकोला : जठार पेठ परिसरात प्रशासनाकडून नुकतीच अतिक्रमण हटाव कारवाई पार पडली. या कारवाईनंतर परिसरातील भाजी विक्रेत्यांसमोर त्यांच्या उदरनिर्वाहाचा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाकडून भाजी विक्रेत्यांसाठी शाळा क्रमांक ५ परिसरातील जागा 'हॉकर्स झोन' म्हणून अधिकृतपणे नेमून देण्यात आली असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात या जागेचा ताबा भाजी विक्रेत्यांना मिळत नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. विक्रेत्यांनी केलेल्या गंभीर आरोपानुसार, ज्या हॉकर्स झोनच्या जागेवर त्यांनी व्यवसाय करणे अपेक्षित आहे, त्याच जागेवर सध्या कथितपणे 'वरली-मटका' आणि जुगाराचा व्यवसाय सुरू आहे. यामुळे अधिकृत जागा असूनही हक्काचा व्यवसाय कुठे करावा, असा मोठा प्रश्न हतबल झालेल्या भाजी विक्रेत्यांसमोर उभा ठाकला आहे.

काल झालेल्या अतिक्रमण विरोधी कारवाईनंतर आपली व्यथा मांडण्यासाठी परिसरातील ५ ते ६ भाजी विक्रेते पुढे आले होते. परंतु, प्रशासकीय कारवाईची भीती आणि वाढता दबाव यामुळे अनेक विक्रेते उघडपणे बोलण्यासही धजावत नसल्याचे भीतीदायक चित्र पाहायला मिळाले. भाजी विक्री हाच अनेक गरीब कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा एकमेव व मुख्य आर्थिक आधार असतो. अशाप्रकारचा व्यवसाय सतत बंद राहिल्यास घरखर्च कसा चालवायचा, मुलांचे स्कूल-कॉलेजचे शिक्षण कसे पूर्ण करायचे आणि दैनंदिन गरजा कशा भागवायच्या, असा आर्त सवाल हवालदिल झालेला भाजी विक्रेता उपस्थित करत आहे.

आता स्थानिक प्रशासनाने आणि संबंधित विभागाने तातडीने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. हॉकर्स झोनची ही ठरवून दिलेली जागा तातडीने खऱ्याखुऱ्या भाजी विक्रेत्यांना मोकळी करून द्यावी आणि त्याठिकाणी सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर जुगार अड्डयाची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी आक्रमक मागणी नागर? व विक्रेत्यांमधून होत आहे. आता या प्रकरणाची प्रशासनाकडून नेमकी काय दखल घेतली जाते आणि हॉकर्स झोनचा वापर नेमका कशासाठी होणार, याकडे संपूर्ण जठार पेठ परिसराचे लक्ष लागले आहे.

# कष्टकऱ्यांच्या दु:खाची दखल कोण घेणार?

शेतकऱ्यांप्रमाणेच भूमिहीन मजूर, रोजंदारी कामगार, छोटे व्यावसायिक आणि पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांसाठी स्वतंत्र सामाजिक-आर्थिक संरक्षण धोरणाची गरज आहे. सरकारी धोरणे आखताना ज्यांच्याकडे जमीन नाही, शेती नाही, मोठा व्यवसाय नाही; परंतु आपल्या श्रमाच्या जोरावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे लाखो नागरिक आहेत, त्यांच्या प्रश्नांकडेही स्वतंत्रपणे आणि गांभीर्याने पाहिले जावे. आज नैसर्गिक आपत्तीचा विचार करताना शेतीच्या नुकसानीची नोंद, पंचनामे आणि नुकसानभरपाई यंत्रणा यांना स्वाभाविकपणे महत्त्व दिले जाते. शेतकऱ्यांना संकटाच्या काळात मदत मिळणे अत्यावश्यक आहे. अन्नदात्याच्या पाठीशी शासन उभे राहिलेच पाहिजे. मात्र याच वेळी समाजाने आणि शासनाने एक मूलभूत प्रश्न विचारण्याची गरज आहे— ज्याच्याकडे एक गुंठाही जमीन नाही, त्याच्या नुकसानीची मोजदाद कोण करणार? ज्यांचे जीवन रोज मिळणाऱ्या कामावर अवलंबून आहे, त्यांच्यासाठी दुष्काळ म्हणजे केवळ पिकांचे नुकसान नसते. अतिवृष्टी म्हणजे केवळ शेतातील उभ्या पिकांचे नुकसान नसते. त्यांच्यासाठी संकट म्हणजे काम बंद होणे, रोजंदारी थांबणे, छोटा व्यवसाय ठप्प होणे आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा आधारच डळमळीत होणे. पाऊस अतिप्रमाणात झाला तर बांधकाम, वाहतूक, हातमजुरी, छोटे व्यवसाय आणि विविध सेवा बंद पडू शकतात. दुष्काळ पडला तर शेतीशी संबंधित रोजगाराच्या संधी कमी होतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला की त्याचा फटका जमीन नसलेल्या कष्टकरी कुटुंबांनाही बसतो. परंतु या कुटुंबांचे उत्पन्नावर जगणारी कुटुंबे यांच्यासाठीही आपत्तीच्या काळात स्वतंत्र मदतव्यवस्था असणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने 'भूमिहीन कष्टकरी आपत्ती सहाय्य योजना' किंवा त्यासारखी स्वतंत्र सामाजिक संरक्षण योजना विचारात घ्यावी. या योजनेत पात्र कुटुंबांना परिस्थितीनुसार थेट आर्थिक सहाय्य, तात्पुरते रोजगाराचे अवसर, मुलांच्या शिक्षणासाठी विशेष सहाय्य, आरोग्यविषयक संरक्षण छोट्या व्यवसायासाठी पुनर्वसन सहाय्य, व्यवसायासाठी आवश्यक साधनांची मदत विमा व सामाजिक सुरक्षा यांसारख्या उपायांचा समावेश करता येऊ शकतो. छोटे व्यवसाय आणि पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांचे प्रश्नही गंभीर आहेत महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात अनेक कुटुंबे पिढ्यान्‌पिढ्या विविध पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून आहेत. कारागीर, लोहार, कुंभार, नाभिक, सुतार, विविध सेवा देणारे छोटे व्यावसायिक, हातकाम करणारे कामगार आणि ग्रामीण भागातील अनेक लघु उद्योजक—यांचे संघटनात्मकदृष्ट्या विखुरलेल्या घटकांचे प्रश्न अनेकदा धोरणनिर्मितीच्या केंद्रस्थानी पोहोचत नाहीत. भूमिहीन कष्टकरी, रोजंदारी कामगार आणि छोटे व्यावसायिक हे अनेक ठिकाणी स्वतंत्र संघटनात्मक शक्तीशिवाय जगत असतात. त्यामुळे त्यांच्या समस्या सातत्याने शासनाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधी हे केवळ जमीनधारक, व्यापारी किंवा एखाद्या विशिष्ट सामाजिक घटकाचे प्रतिनिधी नसतात. ते मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाचे प्रतिनिधी असतात. म्हणून विधानसभेत, संसदेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भूमिहीन कुटुंबांच्या रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षेच्या प्रश्नांवर सातत्याने चर्चा होणे गरजेचे आहे.



गरज आहे. ही मागणी शेतकऱ्यांच्या विरोधात नाही ही मागणी कोणत्याही जातीच्या विरोधात नाही. ही मागणी कोणत्याही सरकारच्या विरोधात नाही. ही मागणी केवळ एका गोष्टीसाठी आहे— धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेत दुर्बल आणि भूमिहीन कुटुंबांचाही स्वतंत्रपणे विचार व्हावा. शेतकऱ्याला आधार मिळाला पाहिजे आणि शेतमजुरालाही. जमीनधारकाला नुकसानभरपाई मिळाली पाहिजे आणि आपत्तीमुळे रोजगार गमावलेल्या भूमिहीन कष्टकऱ्यालाही सामाजिक संरक्षण मिळाले पाहिजे. मोठ्या उद्योगांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे आणि त्याचबरोबर छोट्या व्यवसायांना टिकून राहण्यासाठी आवश्यक आधारही मिळाला पाहिजे. कारण समाजाचा विकास तेव्हाच सर्वसमावेशक म्हणता येईल, जेव्हा विकासाच्या प्रक्रियेत शेवटच्या घटकाचाही विचार केला जातो. शासनाने भूमिहीन आणि आर्थिकदृष्ट्या असुरक्षित कुटुंबांसाठी पुढील बाबींचा गांभीर्याने विचार करावा— भूमिहीन कुटुंबांचे स्वतंत्र सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण करावे. आपत्तीच्या काळात भूमिहीन कष्टकऱ्यांसाठी स्वतंत्र सहाय्य यंत्रणा उभी करावी. रोजगार गमावलेल्या कुटुंबांसाठी तात्पुरत्या रोजगाराच्या संधी वाढवाव्यात. छोट्या व पारंपरिक व्यवसायांसाठी सुलभ कर्ज, प्रशिक्षण आणि आधुनिक साधनांची उपलब्धता वाढवावी. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाशी संबंधित सहाय्य मजबूत करावे. कष्टकरी कुटुंबांसाठी आरोग्य व सामाजिक सुरक्षा कवच अधिक प्रभावी करावे. महिला व तरुणांसाठी कौशल्यविकास आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात.

नुकसान अनेकदा पारंपरिक नुकसानभरपाईच्या निकषांमध्ये दिसत नाही. त्यांच्या घरात अन्नाचा प्रश्न निर्माण झाला, मुलांच्या शिक्षणाचा खर्च थांबला, औषधांसाठी पैसे उरले नाहीत, व्यवसायातील साधने खराब झाली किंवा महिनाभर काम मिळाले नाही—या नुकसानीची नोंद कोणत्या पंचनाम्यात होते हा प्रश्न केवळ एका व्यक्तीचा नाही. हा प्रश्न ग्रामीण आणि निमशहरी भागातील असंख्य भूमिहीन कष्टकरी कुटुंबांच्या सामाजिक सुरक्षेशी संबंधित आहे. शेतकऱ्यांना मदत मिळायलाच हवी; पण भूमिहीनांसाठीही स्वतंत्र व्यवस्था आवश्यक शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईला आमचा विरोध नाही. उलट संकटाच्या काळात शेतकऱ्यांना मदत करणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे परंतु मदतीची व्याप्ती केवळ जमीनधारक कुटुंबांपुरती मर्यादित राहू नये. भूमिहीन मजूर, रोजंदारी कामगार, छोटे पारंपरिक व्यावसायिक, फेरीवाले, कारागीर, सेवा देणारे छोटे व्यावसायिक आणि अत्यल्प व्यवसाय आकाराने छोटे असले तरी समाजाच्या दैनंदिन जीवनात त्यांचे योगदान मोठे आहे. बदलत्या काळात या व्यवसायांसमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. भांडवलाची कमतरता, आधुनिक साधनांचा अभाव, बाजारपेठेपर्यंत मर्यादित पोहोच, प्रशिक्षणाचा अभाव आणि अनिश्चित उत्पन्न यामुळे अनेक कुटुंबांना व्यवसाय टिकवणे कठीण जाते. म्हणून सरकारने या घटकांसाठी— सुलभ कर्ज, कौशल्यविकास, आधुनिक उपकरणे, बाजारपेठ उपलब्धता, विमा, सामाजिक सुरक्षा आणि आपत्तीच्या काळातील पुनर्वसन सहाय्य यांचा एकात्मिक विचार करणे आवश्यक आहे. विशेषतः तरुण पिढीला पारंपरिक व्यवसाय आधुनिक पद्धतीने पुढे नेण्याची संधी दिल्यास रोजगारनिर्मितीलाही चालना मिळू शकते.

"ज्याच्याकडे जमीन नाही, त्याचा प्रश्न कोण मांडणार?" लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाचा आवाज समान महत्त्वाचा आहे. मात्र शिक्षणापासून कोणतेही गरीब मूल वंचित राहू नये भूमिहीन आणि आर्थिकदृष्ट्या असुरक्षित कुटुंबांच्या मुलांसमोर शिक्षणाचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. शाळेची फी, प्रवास, पुस्तके, गणवेश, शैक्षणिक साहित्य, डिजिटल साधने आणि उच्च शिक्षणाचा खर्च या सर्वांचा भार कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी मोठा ठरू शकतो. आर्थिक संकटाच्या काळात सर्वप्रथम परिणाम मुलांच्या शिक्षणावर होऊ नये, यासाठी शासनाने विशेष संरक्षणात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील सरकारी शाळा आणि महाविद्यालयांची गुणवत्ता सुधारण्यासोबतच विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरण, वाहतूक, स्वच्छतागृहे, डिजिटल सुविधा आणि प्रभावी तक्रार निवारण व्यवस्था यांना प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाच्या धोरणात जमीनधारकांच्या नुकसानीसोबतच रोजगार गमावलेल्या भूमिहीन कुटुंबांच्या उत्पन्नातील घट याचाही विचार करण्याची दुष्काळ, अतिवृष्टी आणि पूरस्थितीत रोजगार गमावणाऱ्या कुटुंबांचा स्वतंत्रपणे विचार करावा. पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांच्या व्यवसायाला आधुनिक बाजारपेठेशी जोडण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात. भूमिहीन कष्टकरी आणि छोट्या व्यावसायिकांचे प्रश्न लोकप्रतिनिधींनी विधानसभेत व संसदेत सातत्याने मांडावेत.या योजना कोणत्याही एका जातीपुरत्या मर्यादित न ठेवता सामाजिक आणि आर्थिक गरज, उत्पन्न, रोजगाराची असुरक्षितता आणि आपत्तीमुळे झालेला प्रत्यक्ष परिणाम या निकषांवर पात्र कुटुंबांपर्यंत पोहोचवणे अधिक न्याय्य ठरेल.

**-निवेदक / लेखणी :**
**निवृत्ती तायडे**
**एक भूमिहीन कष्टकरी नागरिक**
**गाव : हिवरखेड**
**ता. तेल्हारा, जि. अकोला**
**मो. 7709517019**




जन्मतारीख: ७, १६, २५ अंक: ७
अधिपती: केतू
मूलांक ७ असलेली व्यक्ती पहिल्या भेटीत फार बोलणारी नसते. ती आधी निरीक्षण करते... समजून घेते... आणि मग बोलते.
जिथे इतरांना फक्त घटना दिसते, तिथे मूलांक ७ ची व्यक्ती त्यामागचं कारण शोधते.
लोक काय म्हणतात यापेक्षा "हे असं का घडलं?" हा प्रश्न तिच्या मनात जास्त असतो.
ही व्यक्ती गर्दीत असूनही स्वतःच्या एका वेगळ्याच मानसिक विश्वात रमलेली असू शकते.

**मूलांक ७ ची खरी ताकद — Deep Thinking**

मूलांक ७ मध्ये विचारांची खोली, अंतर्ज्ञान आणि निरीक्षण यांचा अनोखा संगम दिसतो.
ही व्यक्ती प्रत्येक गोष्ट वरवर स्वीकारत नाही. लोक शब्द ऐकतात...
मूलांक ७ त्या शब्दांमागची भावना ऐकतो. म्हणूनच अनेकदा समोरची व्यक्ती काही न सांगताही तिच्या मनात काय चाललं आहे, याची जाणीव मूलांक ७ ला होते.
त्याला दिखावा आवडत नाही.
त्याला खरं काय आहे? हे जाणून घ्यायचं असतं.

**मूलांक ७ ची काही प्रसिद्ध उदाहरणे**

एम. एस. धोनी — ७ जुलै
७ तारीख = मूलांक ७
धोनीच्या व्यक्तिमत्त्वात मूलांक ७ च्या काही गुणांचा सुंदर संदर्भ पाहायला मिळतो — शांतपणा, निरीक्षण, संयम आणि योग्य क्षणी निर्णय घेण्याची वृत्ती.
मैदानावर परिस्थिती कितीही बदलली तरी आधी ती समजून घेणे आणि मग प्रतिक्रिया देणे — हा त्याच्या सार्वजनिक प्रतिमेचा महत्त्वाचा भाग राहिला आहे.

**मूलांक ७ ची एक खासियत:**

"सगळे घाईत निर्णय घेत असताना... हा थांबतो, पाहतो आणि मग चाल करतो." Charlie Chaplin — १६ एप्रिल
१६ = १ + ६ = ७
जगाला हसवणारा हा महान कलाकार... पण त्याच्या कलेत मानवी जीवनातील दुःख, संघर्ष आणि भावनांची खोल जाणीव दिसते. त्याच्या चेहऱ्यावर हास्य होतं, पण त्याच्या कलेच्या मागे समाज आणि माणसाचं बारकाईने केलेलं निरीक्षण होतं.

**बाहेरून हसू... आतून विचारांची खोली!**

कधी कधी जगाला हसवणाऱ्या माणसाच्या मनातच सर्वात खोल कहाणी दडलेली असते.
अटल बिहारी वाजपेयी — २५ डिसेंबर २५ = २ + ५ = ७
कवी, वक्ते आणि विचारशील सार्वजनिक व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या कवितांमध्ये आणि भाषणांमध्ये विचारांची खोली आणि भावनिक अभिव्यक्ती दिसून येते.
Katrina Kaif —
१६ जुलै १६ = ७
मूलांक ७ च्या संदर्भात तिच्या प्रवासात स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची वृत्ती, मेहनत आणि



**सीमा बक्षी**
अकोला
**मो. 9834571153**

स्वतःच्या मार्गावर पुढे जाण्याची भावना पाहता येते.
मूलांक ७ — Boons
* गहन विचार — प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाण्याची वृत्ती
* अंतर्ज्ञान व निरीक्षण — न बोलताही बऱ्याच गोष्टी जाणवणे
* अध्यात्म व शोधवृत्ती — ज्ञान आणि सत्याचा शोध * स्वतंत्र विचार — स्वतःच्या मार्गाने चालण्याची वृत्ती मूलांक ७ — Curses
याच गुणांची दुसरी बाजूही असते.
अतिविचार — छोट्या गोष्टींचाही मनावर जास्त विचार
भावनिक अलिप्तता — दुखावल्यानंतर स्वतःमध्ये जाणे
विश्वासाचा प्रश्न — सहज कोणावर विश्वास न ठेवणे एकटेपणाची भावना — "मला कोणी समजत नाही..." मूलांक ७ ची सर्वात मोठी अंतर्गत लढाई — "माझं अंतर्ज्ञान खरं सांगतंय... की मी फक्त जास्त विचार करतोय?"
मनाचा एक न दिसणारा कोपरा...
मूलांक ७ व्यक्ती बाहेरून शांत दिसते. पण याचा अर्थ तिच्या मनात भावना नसतात असा नाही.
**ती भावना दाखवत नाही... ती भावना जगते.**
तिला दुखावलं गेलं तर ती लगेच भांडेलच असं नाही. कधी कधी ती फक्त शांत होईल... दूर जाईल... आणि स्वतःच्या मनात उत्तर शोधत राहील.

**म्हणूनच मूलांक ७ साठी एक गोष्ट खूप महत्त्वाची —**

"प्रत्येक गोष्टीचं उत्तर मनात शोधत बसू नका... काही गोष्टी सोडून देणंही शिका."
Lifestyle
मूलांक ७ ला शांत वातावरण, स्वतःसाठी वेळ, प्रवास, निसर्ग, वाचन, अध्यात्म, संगीत, संशोधन किंवा नवीन गोष्टींचा अभ्यास आवडू शकतो. त्याला सतत गर्दीत राहण्यापेक्षा quality people आणि meaningful conversations अधिक महत्त्वाच्या वाटतात.

**Career & Money**

मूलांक ७ च्या विचारशील आणि analytical स्वभावामुळे पुढील क्षेत्रे त्याला अनुकूल वाटू शकतात: Research • Technology • Writing • Teaching • Psychology • Counselling • Spirituality • Data/Analysis • Investigation • Creative Fields
पैशाच्या बाबतीतही एक महत्त्वाची गोष्ट —
विचार खूप आणि action कमी झालं, तर संधी हातातून जाऊ शकतात. म्हणून:
Deep Thinking + Right Action = Growth
एक छोटीशी शायरी...
"खामोश हूँ, कमजोर नहीं,
अकेला हूँ, मगर बेखबर नहीं...
लोग चेहरा पढ़ते रहे,
मैंने तो लोगों की नीयत पढ़ ली।"
मूलांक ७ ची खरी कहाणी...
मूलांक ७ ला आयुष्य नेहमी सरळ रेषेत समजत नाही. तो प्रश्न विचारतो. तो शोध घेतो.
तो पडतो... विचार करतो... पुन्हा उभा राहतो.
आणि कधी कधी त्याचा सर्वात मोठा प्रवास बाहेरच्या जगात नसतोच... तो प्रवास असतो — स्वतःच्या मनापासून स्वतःला समजून घेण्याचा!
Numerology Note
फक्त Mulank ७ पाहून संपूर्ण व्यक्तिमत्त्व ठरवत नाही.
जन्मतारखेत ७ किती वेळा आहे, इतर कोणते अंक आहेत आणि Bhagyank काय आहे — यावरही अंकशास्त्रीय interpretation बदलू शकते.
अंक फक्त संख्या नाहीत...
प्रत्येक अंकामागे एक स्वभाव, एक संघर्ष आणि एक कहाणी असते. तुमचा Mulank ७ आहे का? तुमच्यात यापैकी कोणते गुण आहेत? Comment करून सांगा.

# गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा



गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक ओळखीचा पाठीचा कणा मानला जातो. भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थीला श्री गणेशाच्या आगमनाने सुरू होणारा हा उत्सव केवळ एक धार्मिक विधी न राहता, संपूर्ण महाराष्ट्राला एकत्र आणणारा एक भव्य सामाजिक आणि सांस्कृतिक सोहळा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आणि पेशवाईत गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असे. परंतु, या उत्सवाला आधुनिक आणि व्यापक स्वरूप लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी १८९३ मध्ये दिले.
इंग्रजांच्या विरोधात लोकांना एकत्र आणणे, सामाजिक जनजागृती करणे आणि जनतेमध्ये एकतेची भावना निर्माण करणे या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सवाची पायाभरणी झाली. उत्सवाचे स्वरूप आणि परंपरा गणेशोत्सवाचे प्रमुख पैलू पुढीलप्रमाणे आहेत: घरगुती व सार्वजनिक उत्सव: घराघरांत दीड, पाच, सात किंवा दहा दिवसांसाठी बाप्पांची प्रतिष्ठापना केली जाते. तर गल्लीबोळांत सार्वजनिक मंडळे आकर्षक देखावे आणि मंडप उभारतात.सांस्कृतिक कार्यक्रम: १० दिवसांच्या या उत्सवात आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, नाट्यप्रयोग, संगीत कार्यक्रम आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. पारंपरिक कला: ढोल-ताशा पथके, लेझिम आणि आरतीच्या तालावर होणारा जल्लोष या उत्सवाची शान वाढवतो. प्रसाद: बाप्पाच्या आवडीचे उकडीचे मोदक घराघरांत बनवले जातात. अनंत चतुर्दशीच्या दिवशी "पुढच्या वर्षी लवकर या" अशा जयघोषात आणि अश्रूपूर्ण नयन | भावूक वातावरणात गणपती बाप्पाला निरोप दिला जातो. आजच्या काळात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती (शाडूच्या मातीची मूर्ती) आणि निर्माल्य व्यवस्थापनावर भर देऊन ही परंपरा अधिक जबाबदारीने आणि उत्साहाने पुढे नेली जात आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील एकता, उत्साह आणि संस्कृतीचा जिवंत वारसा आहे.

# शयनस्थ गणपती' इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

## रायसोनी विद्यापीठाचा पर्यावरणपूरक उपक्रम

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

पुणे : टाकाऊ वस्तूंमधून सृजनाची नवी वाट निर्माण करत सामवेद कला, संगीत, दृश्यीकरण, मनोरंजन व रचना विद्यालय, जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटी, पुणे यांच्या वतीने साकारण्यात आलेल्या ३० फुटांहून अधिक लांबीच्या आणि सुमारे २० फूट उंचीच्या भव्य 'शयनस्थ गणपती'ची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली. पुनर्वापरित वर्तमानपत्रांसह इतर वस्तूंनी साकारलेली सर्वांत मोठी शयनस्थ गणेशमूर्ती' या विक्रमाची अधिकृत घोषणा सोमवारी (२१ सप्टेंबर) करण्यात आली. या विक्रमानिमित्त विद्यापीठात सकाळी १०:३० वाजता आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय पोलिस सेवेतील पूर्व विभाग पुणेचे अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या विक्रम परीक्षण अधिकारी डॉ. चित्रा जैन यांच्या उपस्थितीत विक्रमाची अधिकृत



घोषणा करण्यात आली. यामुळे रायसोनी परिवार, सामवेद, विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्या सामूहिक प्रयत्नांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली.
या अभिनव उपक्रमास जी. एच. रायसोनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्सचे अध्यक्ष सुनील रायसोनी, जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. आर. डी. खराडकर आणि प्र-कुलगुरू डॉ. वैभव हेंद्रे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. उपक्रमाचे नेतृत्व व संकल्पनात्मक समन्वय डॉ. अविनाश डी. काटे अधिष्ठाता व प्राध्यापक, सामवेद यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. प्रो. देवेंद्र पोटदुखे आणि प्रो. मधुकर चंदनशिवे यांनी समन्वय व निर्मिती प्रक्रियेत सक्रिय योगदान दिले. विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी घर, कार्यालय तसेच परिसरातून जुनी वर्तमानपत्रे व अन्य टाकाऊ साहित्य संकलित करून या उपक्रमात सहभाग नोंदविला. सुमारे सहा दिवसांच्या सातत्यपूर्ण परिश्रमातून ही भव्य कलाकृती साकारण्यात आली. जागृती आणि

### १० दिवस नागरिकांसाठी दर्शनाची संधी

ही ऐतिहासिक 'शयनस्थ गणपती' कलाकृती २१ सप्टेंबरपासून सलग १० दिवस सामवेद कला दालन, जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटी, शास्त्री नगर, पुणे येथे गणेशभक्त, विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी, पालक, कलाकार, कलाप्रेमी आणि नागरिकांसाठी दर्शनास उपलब्ध राहणार आहे.

### -टाकाऊ साहित्याचा कल्पक वापर....

या भव्य कलाकृतीच्या निर्मितीसाठी १२१ किलो जुनी वर्तमानपत्रे, १५१ किलो टाकाऊ फोम, १०१ किलो टाकाऊ दोरी, धागा व रस्सी, ३ किलो तार, २१ बांबू, एक जुने ट्रॅक्टरचे टायर, फेकून दिलेले लोखंड तसेच अन्य पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर करण्यात आला. वर्तमानपत्रांचे थर जोडण्यासाठी २१ किलो गव्हाच्या पिठापासून तयार केलेली नैसर्गिक चिक्की/खळ वापरण्यात आली.विशेष म्हणजे, स्वतंत्र कृत्रिम रंगांचा वापर न करता रंगीत वर्तमानपत्रे, रंगीत कागद आणि छपाईतील रंगछटांचा कल्पक वापर करून या टाकाऊ कागदाचे दृश्यकलेत रूपांतर करण्यात आले.

**शाश्वतताचा संदेश**

'टाकाऊपासून शाश्वतता' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून गणेशोत्सवाच्या माध्यमातून पुनर्वापर, कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वततेचा संदेश देण्यात आला आहे. टाकाऊ वस्तू फेकू नका; त्यातील शक्यता ओळखा. कचरा समजू नका; त्यातून सृजन घडवा, असा संदेश या कलाकृतीतून देण्यात आला.

# शिक्षणाची गंगोत्री बहुजन समाजापर्यंत पोहोचविणारा आधुनिक भगिरथ!

कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ होते. सामूहिक शिक्षणाचे पुरस्कर्ते असलेल्या भाऊरावांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. 'कमवा आणि शिका' या तत्त्वज्ञानाची सुरुवात करून त्यांनी मागास जाती आणि अल्प उत्पन्न असलेल्या लोकांना शिक्षित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ते महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे महत्त्वाचे सदस्य होते. भाऊराव पाटील हे जन्माने जैन होते. मात्र जनतेमध्ये ते इतके मिसळून गेले की संपूर्ण बहुजन समाजाला ते आपले वाटले. पाटील हे आडनाव (पद) भाऊरावांच्या घराण्याला पूर्वीपासूनच प्राप्त झाले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व जातीभेदाच्या पलीकडे होते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करताना विद्यार्थ्यांमध्ये बंधुता व समता रुजावी, यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणातून समता व बंधुता याचे संस्कार विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी चालवलेल्या वसतिगृहात विविध जाती-धर्माचे विद्यार्थी एकत्र राहत असत, ते सर्वजण स्वतःच्या हाताने सामुदायिकरित्या स्वयंपाक करत आणि एकत्रच जेवण करत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण प्रसारासाठी दिले. महाराष्ट्रातील एक प्रेरणादायी शिक्षणयात्री म्हणून ते ओळखले जातात. महाराष्ट्रातील जनतेने त्यांना कर्मवीर (कृतींचा राजा) ही उपाधी देऊन सन्मानित केले. भारत सरकारने १९५९ मध्ये पद्मभूषण हा भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन आणि १९८८ मध्ये त्यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रकाशित करून भाऊराव पाटील यांचा सन्मान केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगे महाराज, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासोबत कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जवळचे संबंध होते. कर्मवीर भाऊराव यांचे पूर्ण नाव भाऊराव पायगौंडा पाटील असे होते. आईचे नाव गंगाबाई होते. त्यांचे मूळ गाव कर्नाटक राज्यात दक्षिण कन्नड जिल्ह्यातील मूडब्रिदी गावचे. कर्मवीर यांचे पुर्वज नशीब अजमावण्यासाठी महाराष्ट्रात आले. पूर्वीचे त्यांचे आडनाव देसाई होते. पुढे ते एतवडे जि. सांगली येथे स्थिर झाले. पुढे त्यांच्या घराण्यात पाटीलकी आली. त्यामुळे त्यांचे देसाई हे नाव जाऊन पाटील हे नाव रूढ झाले. कोल्हापूर जिल्ह्यात हातकणंगले तालुक्यात डोंगराच्या कुशीत कुंभोज नावाचे छोटेशे गाव आहे. या गावी २२ सप्टेंबर 1887 रोजी कर्मवीरांचा जन्म झाला. त्यांचे बालपण कुंभोज या गावी गेले. भाऊरावांच्या आईला इतर जातीचीच नव्हे तर ब्राह्मणाची शिवाशिवही चालत नसे, एवढे हे कर्मठ घराणे होते. असे असले तरी भाऊराव लहानपणापासूनच बंडखोर होते. अन्यायाची त्यांना प्रचंड चीड होती. त्यांचे बालपण कुंभोजमधील अस्पृश्य मुलांच्यात खेळण्यात गेले. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात राग होता. अस्पृश्य समाजातील लोकांना पाणी दिले जात नाही म्हणून त्यांनी एका विहिरीचा रहाटच मोडून टाकला होता. त्यांचे प्राथमिक शिक्षण सांगली जिल्ह्यातील विटा आणि इतरही काही गावांत झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांना कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांची राहण्याची सोय जैन बोर्डिंगमध्ये करण्यात आली होती. याच काळात त्यांच्यावर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव पडला. कर्मवीर लहानपणापासून बेडर वृत्तीचे होते. १९३२ मध्ये महात्मा गांधी व बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये पुणे करार झाला.



## गणेशोत्सवात अकोटकरांना अंधाराची शिक्षा

**अकोट:** गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना अकोट शहरातील अनेक भागांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला आहे. ऐन सायंकाळी, बाजारपेठांमध्ये गर्दी असताना आणि धार्मिक कार्यक्रम सुरू असतानाच वीज गायब होत असल्याने नागरिकांना अक्षरशः अंधाराची शिक्षा भोगावी लागत आहे.

शहरात गणेशोत्सव, महालक्ष्मी पूजन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे मोठी लगबग सुरू असताना. बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढली असताना अचानक वीजपुरवठा खंडित होत असल्याने व्यापाऱ्यांचे व्यवहार ठप्प होत आहेत. अनेक दुकानांमध्ये ग्राहकांची गैरसोय होत असून व्यावसायिकांना आर्थिक फटकाही बसत असल्याची तक्रार आहे.

# पातूरच्या जैन मंदिरात धाडसी चोरी

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**पातूर :** पातूर शहरातील खानापूर रोडवरील जैन मंदिराला अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य करून दोन तोळे सोन्याचा मुकुट तसेच दानपेटीतील रोख रक्कम लंपास केल्याची घटना समोर आली आहे. धार्मिक स्थळातच चोरट्यांनी हात साफ केल्याने शहरात खळबळ उडाली असून, पातूर पोलिसांच्या रात्रगस्ती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, गेल्या तीन महिन्यांत पातूर शहरात चोरी व घरफोडीच्या सात ते आठ घटना घडल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे. मात्र, या घटनांपैकी किती गुन्ह्यांचा ठोस तपास झाला, किती आरोपी निष्पन्न झाले आणि किती मुद्देमाल हस्तगत झाला, याबाबत नागरिकांमध्ये नाराजी आहे. अलीकडेच पातूर शहरात भरदिवसा बंद घरांचे कुलूप तोडून चोरी झाल्याची घटनाही समोर आली होती.

## पोलिसांच्या रात्रगस्तीवर पुन्हा प्रश्नचिन्ह!




### २७ चेकपोस्ट आणि स्कॅनर नेमके कशासाठी?

पातूर शहरात २७ चेकपोस्टवर स्कॅनर लावण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, या चेकपोस्टवर पोलिसांकडून नियमित भेटी, तपासणी आणि प्रभावी निगराणी होत नसेल तर ही यंत्रणा केवळ कागदोपत्रीच राहणार का, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

चोरी करून चोरटे शहराबाहेर पसार होत असतील तर शहराच्या प्रवेश-निर्गमन मार्गांवरील चेकपोस्टचा उपयोग काय? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून विचारला जात आहे.

### चोरट्यांना पोलिसांची भीती राहिली आहे का?

एका पाठोपाठ एक चोरीच्या घटना घडत असताना नागरिकांच्या मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. घरफोडी, मोबाईल चोरी, भंगार दुकानातील चोरी आणि आता थेट मंदिरातील चोरी—घटनांची मालिका सुरू असताना पोलिसांच्या तपासाची आणि प्रतिबंधात्मक कारवाईची दिशा नेमकी काय आहे? हा प्रश्न आता वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

मंदिरासारख्या धार्मिक स्थळालाही चोरट्यांनी लक्ष्य करण्याचे धाडस केले असेल, तर कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे.

### गणेशोत्सवात अतिरिक्त बंदोबस्त, तरी मंदिरात चोरी!

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात होमगार्ड तसेच अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात असल्याचे सांगितले जाते. असे असतानाही खानापूर रोडवरील जैन मंदिरात चोरी होणे ही पोलिसांच्या बंदोबस्त व्यवस्थेची कार्यक्षमता तपासण्याची वेळ असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### बंदोबस्त नेमका कुठे आहे?

रात्रगस्तीचे नियोजन प्रत्यक्षात कितपत होते? पोलिसांची वाहने रात्री शहरातील संवेदनशील भागातून फिरतात का? असे अनेक प्रश्न या घटनेनंतर उपस्थित होत आहेत.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पातूरकडे लक्ष देण्याची मागणी

चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पातूर शहरातील रात्रगस्ती, चेकपोस्ट, सीसीटीव्ही यंत्रणा आणि प्रलंबित चोरीच्या गुन्ह्यांचा स्वतंत्र आढावा घ्यावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

चोरी करणारे मोकाट आणि नागरिक भयभीत, अशी परिस्थिती निर्माण होण्यापूर्वी पोलिसांनी कठोर पावले उचलण्याची गरज आहे. जैन मंदिरातील चोरीचा तातडीने तपास करून चोरट्यांना जेरबंद करणे आणि चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करणे, हे आता पातूर पोलिसांसमोरील मोठे आव्हान ठरले आहे.

## बाळ काळणेंना सेवेचा पुरस्कार



प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अकोला:** निर्माण मल्टीस्टेट कॉ- सोसायटी तर्फे जिल्हातील ज्या लोकांनी देशस्तर किंवा जागतिक स्तरावर स्व कर्तृत्वाने कार्याचा ठसा उमटविला अशा व्यक्तिंच्या सेवेत बाळ काळणे यांना महासम्मान देण्यात आला. कॅन्सर वर व 79 अपंगत्वावर मात करून सर्पसेवा व वन्यजिव सेवा अविरत सुरू ठेवली. म्हणुन त्यांना जागतिक स्तरावर त्यांच्या सेवेची नोंद झाली . कॅन्सर व मात करून कॅन्सर जन जागृति संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा व तालुक्या मध्ये जावुन कॅन्सर वर व्याख्याने दिलीत तर त्या त्या जिल्हातील विद्यार्थी वर्ग व समाज सेवकांबरोबर कॅन्सर जन जागृतिच्या प्रभात फेऱ्या काढून कॅन्सरची भीती नष्ट करण्याची त्यांची ही सेवा परिणामकारक ठरली . अशा त्यांच्या धाडसी कामगिरी बद्दल त्यांना हा बहुमान देण्यात आला. निर्माण चे संचालक गणेश राव देशमुख , गजानन खोटरे व त्यांच्या शेकडो सदस्यांनी स्थानिक जानोरकर मंगल कार्यालयात 20 रोजी सत्कार झाला.

## अकोट जेसीजचा आनंदोत्सव साजरा

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अकोट :** अकोट स्थानिक अकोट शहरात 46 वर्षापासून कार्यरत असलेल्या सामाजिक संस्था जेसीआय अकोट च्या वतीने आनंद उत्सव समारोपीय कार्यक्रम रामनारायण लॉन येथे उत्साहात पार पडला. यावेळी मंचावर फोरम अध्यक्ष जेसी संजय पवार,प्रमुख अतिथी अकोट शहर ठाणेदार किशोर जुनघरे, विशेष अतिथी म्हणून श्री परमानंद धावराणी (बाबूजी), नंदकिशोर शेगोकार,सोहम माकोडे, झोन ऑफिसर अतुल भिरडे, अंचल उपाध्यक्ष डॉ. कृष्णन बजाज, विनोद कडू, प्रथम महिला दिपाली कडू, पूजा मिरकुटे, आरुषी झाडे, रियांश लहाने, स. प्र. संदीप



चांडक, गोपाल हाडोळे व अध्याय सचिव हरीजी सेजपाल यांची उपस्थिती होती.

यावेळी जेसी संदीप चांडक यांनी सप्ताहातील विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला. त्यानंतर सप्ताहादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'सम्राज्ञी' डान्स कॉम्पिटिशन मधील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

ग्रुप 'ए'मध्ये प्रथम क्रमांक वैभवी होरे, द्वितीय क्रमांक उर्वी रघुवंशी आणि तृतीय क्रमांक वीरा खोडके यांनी मिळविला. प्रोत्साहनपर पारितोषिकांमध्ये आराध्या भुयारकर यांनी प्रथम, तर काव्या खारोडे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

ग्रुप 'बी'मध्ये प्रथम क्रमांक प्राजक्ता जोशी, द्वितीय क्रमांक चंचल मिसाळ आणि तृतीय क्रमांक धनश्री बेराड यांनी मिळविला. तसेच 'सेल्फी विथ गणपती' स्पर्धेत प्रथम क्रमांक अमित रघुवंशी, द्वितीय क्रमांक निधी ठाकूर आणि तृतीय क्रमांक पलक सुलताने यांनी मिळविला.

सर्व विजेत्यांना ट्रॉफी, रोख बक्षीस, मेडल आणि प्रमाणपत्र पाहुण्यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले, शेतकरी मोटर्स मुकेश पिंजरकर यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना साठी जेसीआय अकोटचे पूर्वाध्यक्ष, सदस्य तथा पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले अशी माहिती अकोट जेसीज चे जनसंपर्क अधिकारी विवेक गणोरकार कळवितात.

## शहरावरील संवेदनशीलतेचा डाग पुसल्या जाणार?

### अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी यांची ग्वाही

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**हिवरखेड :** शहराला लागलेला संवेदनशीलतेचा डाग लवकरच पुसल्या जाणार असल्याची ग्वाही अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी यांनी दिली आहे. तसेच मिरवणुकी दरम्यान ध्वनिक्षेपकांचा आवाज निर्धारित मर्यादितच ठेवावा असे आवाहन एस डी पी ओ निखिल पाटील यांनी केले.

पोलिस प्रशासन, लोकप्रतिनिधी, पत्रकार, शांतता समिती सदस्य, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते जागरूक नागरिक, आणि गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हिवरखेड सह पंचक्रोशीतील नागरिकांच्या उपस्थितीत



सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची बैठक झाली. आगामी गणेशोत्सव आणि विसर्जन मिरवणूकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीला अकोटचे एस.डी.पी.ओ. निखिल पाटील, तसेच हिवरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार सचिन पाटील उपस्थित होते. यावेळी गणेशोत्सव काळात शांतता व सुव्यवस्था राखणे, कायदा व नियमांचे पालन करणे, मिरवणुकीचे नियोजन, ध्वनीक्षेपकाचा मर्यादित वापर, तसेच सामाजिक सलोखा कायम ठेवणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनीही प्रशासनास सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. गावातील गणेशोत्सव शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासन आणि गणेश मंडळांमध्ये समन्वय ठेवण्यावर यावेळी भर देण्यात आला.

यावेळी उपस्थित विविध मान्यवरांतर्फे पोलीस अधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले तसेच. गावातील गणमान्य व्यक्ती पत्रकार बंधू पोलीस पाटील गणेश मंडळाचे पदाधिकारी, विविध धर्माचे नागरिक यांनी आपापली मनोगत व्यक्त केली. त्यांना पोलीस अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिल्यामुळे गणेश मंडळ आणि पोलिसांमधील समन्वय पाहता गणेशोत्सव मिरवणूक शांततेत पार पडेल असे आश्वासन सर्वांनी दिले.

## संदीप भुस्कट मराठवाडा रत्न पुरस्काराने सन्मानीत

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अकोट :** येथील संदीप मधुकरराव भुस्कट यांना मराठवाडा रत्न पुरस्कार देण्यात आला. क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याने प्रेरित होऊन त्यांनी फुले दांपत्याचे विचार घरोघरी पोहोचविण्या साठी फुले ब्रिगेड ही संस्था स्थापन केली, व त्या मार्फत वेळोवेळी समाजोपयोगी कार्य केले जसे नेत्ररोग तपासणी शिबिर आयोजित करणे,ठीक ठिकठिकाणी रक्तदान शिबिरे, रक्तगट तपासणी शिबिर,गुणवंत विद्यार्थ्यांचा




सत्कार,वृक्षारोपण,आरोग्य तपासणी शिबिर , महात्मा फुले यांचे विचार घरोघरी पोहोचावे म्हणून त्यांची पुस्तके वाटप करणे,त्यांचे प्रतिमा भेट देणेअसे अनेक कार्य वेळोवेळी करतात व 2002 मध्ये त्यांना राज्यस्तरीय माळी युवा भूषण पुरस्कार मिळाला असून त्यांचे पत्नी डॉ किरण भूस्कट या भुस्कट दांपत्याने कोरोना काळात भरपूर काम केले.

## रक्तदान शिबीरास उत्स्फुर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अडगांव बु.:** येथील श्री नवनिर्मित गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सामाजिक उपक्रमांतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम माजी जि.प.सदस्य डॉ.मनमोहन व्यास, माजी जि.प.सदस्य गोपाल कोल्हे,पोलीस पाटील हितेश हागे ,नरेद्र मानकर पत्रकार विलास वानखडे, राजु रोहणकार,अध्यक्ष विशाल देशमुख, उपाध्यक्ष अनुप देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान करुण सुरुवात करण्यात आली. या शिबिराला रक्तदात्यांचा अतिशय उत्स्फूर्त



प्रतिसाद लाभला.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक जाणीव जपण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तसंकलनाचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील वैद्यकीय चमू उपस्थित होती.

या शिबिरात अनेक नागरिकांनी व युवकांनी पुढे येऊन स्वेच्छेने रक्तदान केले. मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## श्रावण बाळ-संजय गांधी योजनेचे दोन महिन्यांचे अनुदान रखडले; लाभार्थी चिंतेत

**अकोट:** श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना व संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या हजारो लाभार्थ्यांना गेल्या दोन महिन्यांहून अधिक काळापासून अनुदानाची प्रतीक्षा करावी लागत आहे. ऐन सणासुदीच्या काळातही लाभार्थ्यांच्या खात्यात नियमित रक्कम जमा होत नसल्याने त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

लाभार्थ्यांच्या माहितीनुसार, दिनांक १८,१९ ऑगस्ट २०२६ रोजी केवळ एका महिन्याची रक्कम खात्यात जमा झाली होती. त्यानंतरचे दोन महिन्यांचे अनुदान अद्यापही मिळाले नसल्याने अनेक वृद्ध, निराधार, विधवा व दिव्यांग लाभार्थी चिंतेत आहेत. सुमारे दोन महिने २२ दिवस उलटूनही अनुदान न मिळाल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव यांसारख्या सणांच्या पार्श्वभूमीवर दैनंदिन खर्च, औषधोपचार तसेच घरगुती गरजा भागविणे कठीण झाले असल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. अनेक लाभार्थ्यांसाठी ही योजना उत्पन्नाचा प्रमुख आधार असल्याने अनुदानातील विलंबाचा थेट परिणाम त्यांच्या जीवनमानावर होत आहे.

## जय बजरंग गणेश उत्सव मंडळाचे गरजूंना अन्नदान

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अकोला:** उत्सव म्हणजे केवळ ढोल-ताशांचा गजर, रोषणाई किंवा मोठे देखावे नव्हे, तर सामाजिक बांधीलकी जपत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आनंद पोहोचवणे होय. हाच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून व्याळा पेठ येथील जय बजरंग गणेश उत्सव मंडळ यांच्या वतीने, रविवार २० सप्टेंबर २०२६ रोजी एक अत्यंत कौतुकास्पद आणि संवेदनशील उपक्रम राबवण्यात आला. गणेशोत्सवाचे औचित्य साधून मंडळाच्या कार्यकर्त्यांनी थेट जमिनीवर उतरून जिल्हा स्त्री रुग्णालय आणि अकोला रेल्वे स्थानक या दोन्ही ठिकाणी गरजू व गरिबांना अन्नदान केले."अन्नदान हेच श्रेष्ठ दान" हा विचार केवळ बोलण्यात न ठेवता तो कृतीत आणण्याचे काम जय बजरंग मंडळाने केले आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयामध्ये दूरवरून अनेक



गरीब रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपचारासाठी येत असतात. अनेकदा या नातेवाईकांना वेळेवर आणि दर्जेदार भोजन मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. हीच गरज ओळखून मंडळाच्या वतीने रुग्णालयाच्या परिसरात रुग्णांच्या नातेवाईकांना आपुलकीने भोजन देण्यात आले.रुग्णालयासोबतच रेल्वे स्थानक परिसरातील निराधार, मजूर आणि गरजू व्यक्तींनाही यावेळी अन्नदान करण्यात आले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अत्यंत नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध पद्धतीने अन्न वाटपाचे काम चोख पार पाडले. अचानक मिळालेल्या या सुखद धक्क्याने आणि तृप्त भोजनाने अनेक गरजूंनी मंडळाच्या कार्यकर्त्यांना भरभरून आशीर्वाद दिले.आजच्या काळात जिथे उत्सवांवर लाखो रुपयांची उधळण केली जाते, तिथे व्याळा पेठच्या या मंडळाने सामाजिक भान जपून एक नवा पायंडा पाडला आहे. जय बजरंग गणेश उत्सव मंडळाचे हे सामाजिक कार्य इतर सर्व मंडळांसाठी नक्कीच मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही. मंडळाच्या या पवित्र कार्याबद्दल संपूर्ण अकोला परिसरातून आणि सुजाण नागरिकांमधून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## शेतकरी संघटनेचा 5 ऑक्टोबरला जिल्ह्यात चक्का जाम




प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**हिवरखेड:** 5 ऑक्टोबरला शेतकरी संघटनेचे नेते लक्ष्मीकांत कौठकर यांनी जिल्ह्यात चक्का जाम आंदोलनाची घोषणा केलेली आहे. या आंदोलनात जास्तीत जास्त गावांनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले आहे. गावागावात सभा सुरु आहे.

आंदोलनाचे प्रमुख विषय राज्यात कोरडा गंभीर दुष्काळ जाहीर करावा, रंभापूर ते वारखेड होणाऱ्या सिमेंट रोड वर प्रत्येक गावा लगत 24 मिटर रोड करून रस्ता दुभाजक, स्ट्रीट लाईट,आणि फुटपाथ करण्यात यावे, महावितरण ने स्मार्ट मिटर रद्द करून वीज अधिनियम 2003 प्रमाणे मिटर निवडण्याचा अधिकार ग्राहकांना आहे. शेतकऱ्यांना त्रासदायक ठरलेला वन्यजीव संरक्षण कायदा 1972 रद्द करावा. या मागणी करिता जिल्हात चक्का जाम आंदोलन पुकारले आहे.

## महात्मा फुले विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**बाळापूर :** आपल्या दैनंदिन जीवनात व परिसरात अचानक उद्भवणाऱ्या विविध आपत्तींना धैर्याने व योग्य नियोजनाने कसे सामोरे जावे, याविषयीचे धडे पारस येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात देण्यात आले. 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट, मुंबई' यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता ९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. अमोल उके (मेंटॉर आकाश ओके) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या परिसरात उद्भवणाऱ्या मानवनिर्मित व निसर्गनिर्मित अशा दोन्ही प्रकारच्या आपत्तींमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व



आर्थिक हानी होते. सर्पदंश, लागलेली आग, अचानक येणारा महापूर, अन्न किंवा रासायनिक विषबाधा, हृदयविकाराचा झटका तसेच रस्ते अपघात यांसारख्या घटना सतत घडत असतात. अशा आपत्कालीन परिस्थितीत घाबरून न जाता तातडीने कोणत्या उपाययोजना कराव्यात आणि जीवितहानी कशी टाळावी, याबद्दल त्यांनी प्रात्यक्षिकांसह सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य दिनेश तायडे, प्रा. सुरेश किरतकर, संजय बारतासे, निलेश पुंडे, अमोल इंगळे, प्रा. सूर्यकांत मिटकरी, संजय कीर्तने यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश पुंडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. सुरेश किरतकर यांनी मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# डॉल्बी, प्लाझ्मा, प्रेशर मिड साऊंड सिस्टिमवर निर्बंध

## १ नोव्हेंबरपर्यंत निर्बंध; जिल्हाधिकाऱ्यांची अधिसूचना

### नियमांचे पालन करण्याचे आवाहन

■ सर्व मंडळे, संस्था, आयोजक, ध्वनिवर्धक यंत्रणेचे मालक, चालक व ऑपरेटर तसेच सार्वजनिक कार्यक्रमांच्या आयोजकांनी अधिसूचनेचे काटेकोर पालन करावे. ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हादंडाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**यवतमाळ :** उत्सवांच्या काळात मिरवणुकांमध्ये ध्वनी प्रदूषणाची पातळी वाढू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने डॉल्बी, टॉप-मिड-बेस मल्टीस्पीकर, प्लाझ्मा आणि प्रेशर मिड साऊंड सिस्टिमवर निर्बंध घातले आहेत. जिल्हादंडाधिकारी विकास मीना यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अन्वये सोमवारी (दि. २१) याबाबत अधिसूचना जारी केली. हे निर्बंध अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून १ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्रमांक ९०/२०२५ मध्ये ११ सप्टेंबर रोजी दिलेल्या आदेशानुसार विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये ध्वनी प्रदूषण नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार यवतमाळ जिल्ह्यातही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली आहे.

गणेशोत्सव तसेच अन्य सणांच्या आगमन व विसर्जन मिरवणुकांमध्ये मोठ्या क्षमतेच्या मल्टीस्पीकर सिस्टिमचा वापर होण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. विशेषतः टॉप, मिड आणि बेस स्पीकरचे थर रचून उभारण्यात येणाऱ्या साऊंड सिस्टिममुळे ध्वनीची तीव्रता निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक जाण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

**मॉडिफाइड वाहनांवरही निर्बंध**

: डॉल्बी किंवा अन्य मोठ्या साऊंड सिस्टिमची वाहतूक व उभारणी करण्यासाठी वाहनांमध्ये अनधिकृत अथवा बदल करण्यात आलेल्या वाहनांच्या वापरावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. चालक, मालक, आयोजक अथवा संबंधित व्यक्तींनी अशा वाहनांचा वापर करू नये, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ आणि ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम २००० चे उल्लंघन होऊ नये, तसेच ध्वनी प्रदूषणामुळे नागरिकांना त्रास आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने ही कारवाई केली आहे.

# मार्कंडा शिवारात वाघाच्या पाऊलखुणा; शेतकऱ्यांत भीती

प्रतिनिधी २२ सप्टेंबर





**कळंब :** तालुक्यातील जोडमोहा वनपरिक्षेत्रांतर्गत मार्कंडा शिवारातील कोळेझरी रस्त्यावर रविवारी (२० सप्टेंबर) सायंकाळी वाघाच्या ताज्या पाऊलखुणा आढळल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकरी रामचंद्र गाडेकर हे पाऊस थांबल्यानंतर सायंकाळी साडेपाचच्या सुमारास शेतातील बैल आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना रस्त्यावर वाघाच्या स्पष्ट व ताज्या पाऊलखुणा दिसून आल्या. विशेष म्हणजे, वाघ पुढे जात असताना गाडेकर त्याच्या मागच्या दिशेनेच जात होते. दोघांमध्ये फारसे अंतर नसल्याने त्यांना वाघाकडून बैलांवर हल्ला होण्याची भीती वाटली. त्यांनी सावधपणे बैल सोडून त्यांना घेऊन घर गाठले.

वाघ कोळेझरी आणि आसोलीच्या शिवाराच्या दिशेने पुढे गेल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. 'केवळ एक मिनिटाचा फरक पडला; अन्यथा वाघाशी माझी थेट गाठ पडली असती,' अशी प्रतिक्रिया गाडेकर यांनी दिली. घाबरलेल्या अवस्थेत असल्याने तत्काळ कोणाला फोन करण्याचेही त्यांच्या लक्षात आले नाही. या परिसरात वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याने शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. वन विभागाने पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच शेतांच्या परिसरात जाळीचे कुंपण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. यापूर्वीही गाडेकर यांच्यावर रानडुकराने हल्ला केल्याचे सांगण्यात आले.

# मुकुटबन-गडचांदूर रेल्वेमुळे विदर्भाला नवे बळ

## ३८ किमी मार्गासाठी ४९३ कोटी; खाण व सिमेंट उद्योगांना मिळणार गती

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**झरी :** विदर्भातील औद्योगिकीकरणाला चालना देणारा मुकुटबन ते गडचांदूर हा नवीन रेल्वे मार्ग साकारण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील औद्योगिक पट्टा जोडणाऱ्या या ३८.२१ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गासाठी सुमारे ४९३ कोटींचा खर्च अपेक्षित असून, या प्रकल्पामुळे खाण, सिमेंट आणि मालवाहतूक क्षेत्राला मोठी गती मिळणार आहे.

प्रस्तावित मार्गामुळे यवतमाळ जिल्ह्यातील मुकुटबन परिसराला थेट चंद्रपूर जिल्ह्यातील गडचांदूर रेल्वे स्थानकाशी जोडणी मिळणार आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर कोळसा, चुनखडीच्या खाणी तसेच सिमेंट उद्योग कार्यरत आहेत. सध्या या उद्योगांच्या मालवाहतुकीचा मोठा भार वर्धा-माणिकगड आणि बल्हारशाह-नागपूर रेल्वेमार्गांवर पडत असल्याने पर्यायी मार्गाची गरज व्यक्त केली जात होती.

नवीन रेल्वेमार्ग कार्यान्वित झाल्यानंतर दरवर्षी सुमारे ६.०८ दशलक्ष टन मालवाहतूक होण्याचा अंदाज आहे. कोळसा, सिमेंट आणि विविध खनिजांची वाहतूक अधिक वेगाने आणि कमी खर्चात होणार असल्याने उद्योग क्षेत्राला मोठा फायदा होईल.

मालवाहतुकीसोबतच स्थानिक नागरिकांच्या सोयीचाही विचार करण्यात आला आहे. या मार्गावर दोन्ही दिशांना प्रत्येकी दोन मेमू प्रवासी गाड्या चालविण्याचे नियोजन असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे कामगार, विद्यार्थी आणि सर्वसामान्य प्रवाशांना सुरक्षित व परवडणारा प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

या रेल्वे प्रकल्पामुळे यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील दळणवळण अधिक गतिमान होण्याबरोबरच औद्योगिक गुंतवणुकीला चालना मिळेल, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि विदर्भाच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# तेलंगणातून चोरट्यास अटक

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**पांढरकवडा :** येथील बसस्थानकाच्या पार्किंगमधून चोरीस गेलेली स्प्लेंडर प्लस मोटारसायकल तेलंगणा राज्यातून शोधून काढण्यात पांढरकवडा पोलिसांना यश आले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपासाची दिशा निश्चित करून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत चोरीची दुचाकी जप्त केली.

पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे अफसर खान शेरखान (४१, रा. यासीन प्लॉट, ताजबाग, अयोध्यानगर, नागपूर) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली.

प्रल्हाद रामदास चव्हाण (४३, रा. वसंतनगर) यांनी त्यांची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्र. एमएच २९ एक्स ३६४४) पांढरकवडा बसस्थानकाच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. सुमारे ५० हजार रुपये किमतीची ही दुचाकी काही वेळाने परत येऊन पाहिली असता जागेवर आढळली नाही. याप्रकरणी त्यांनी पांढरकवडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी अपराध क्रमांक ११३६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान डी.बी. पथकाने बसस्थानकासह शहरातील विविध ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात आरोपी दुचाकी घेऊन पांढरकवड्याबाहेर गेल्याचे स्पष्ट झाले. तपासातून आरोपी तेलंगणाच्या दिशेने गेल्याचे निष्पन्न झाले.

# पोलिस भरतीच्या सरावासाठी नेहरू स्टेडियमचे शुल्क माफ करा

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



## डॉ. निरज वाघमारे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**यवतमाळ :** पोलिस दलात भरती होऊन समाजाची सेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगून मैदानी सराव करणाऱ्या युवक-युवतींसाठी नेहरू स्टेडियमचे प्रवेश व सराव शुल्क पूर्णतः माफ करावे, अशी मागणी डॉ. निरज वाघमारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यवतमाळ शहरासह जिल्ह्यातील मोठ्या संख्येने युवक-युवती पोलिस भरतीची तयारी करीत आहेत. यामध्ये शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि सर्वसामान्य कुटुंबांतील युवकांचा मोठा समावेश आहे. शिक्षण, अभ्यासिका, प्रवास, भरती अर्ज आणि शारीरिक प्रशिक्षणाचा खर्च आधीच करावा लागत असल्याने मैदानाचे शुल्क हा अतिरिक्त आर्थिक भार ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विशेषतः एखाद्या दिवशी शुल्क भरण्यासाठी पैसे उपलब्ध नसल्यास संबंधित युवकाला मैदानात प्रवेश मिळत नाही. त्यामुळे त्याचा सरावाचा दिवस वाया जातो. पोलिस भरतीच्या प्रक्रियेत मैदानी सरावाला मोठे महत्त्व असल्याने आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही उमेदवाराच्या संधीवर परिणाम होऊ नये, अशी भूमिका डॉ. वाघमारे यांनी मांडली.

नेहरू स्टेडियम ही सार्वजनिक क्रीडा सुविधा असून पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या युवकांसाठी ते महत्त्वाचे सरावाचे ठिकाण आहे. आज मेहनत करणारे हे युवक भविष्यात पोलिस दलात दाखल होऊन समाजाच्या सुरक्षिततेची जबाबदारी पार पाडणार आहेत. त्यामुळे त्यांच्या मार्गातील आर्थिक अडथळे दूर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या पात्र युवक-युवतींना नेहरू स्टेडियममध्ये विनामूल्य प्रवेश देऊन सरावाचे शुल्क माफ करण्याचे आदेश तातडीने निर्गमित करावेत, अशी मागणी डॉ. निरज वाघमारे यांनी केली आहे.

"पैशाअभावी कोणत्याही युवकाचे पोलिस होण्याचे स्वप्न मैदानाच्या प्रवेशद्वारावर थांबू नये," अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# गावठी पिस्तुलासह तरुण ताब्यात

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**उमरखेड :** पुसद-उमरखेड मार्गावरील तरोडा फाटा परिसरात गावठी पिस्तुल घेऊन उभ्या असलेल्या २३ वर्षीय तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पुसद कॅम्प पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडून गावठी बनावटीचे देशी पिस्तुल आणि एक जिवंत काडतूस असा एकूण ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई शनिवारी (दि. १९) करण्यात आली.

शेख अरबाज शेख रोशन (वय २३, रा. वरुड, ता. पुसद) असे ताब्यात घेण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोफाळी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना तरोडा फाटा येथील एका हॉटेलजवळ एक तरुण गावठी पिस्तुल घेऊन उभा असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानंतर पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत संशयिताला ताब्यात घेतले. गावठी बनावटीचे देशी पिस्तुल, जिवंत काडतुस जप्त केले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, सहाय्यक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी गौरव कायंदे पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे आणि पोफाळी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक निलेश शेंबडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत सहायक पोलिस निरीक्षक धीरज बांडे, पोलिस उपनिरीक्षक अमोल राठोड, सुरेश शिंदे, सफौ मुन्ना आडे, संतोष भोरगे, पोलिस हवालदार तेजाब रणखांब, सुभाष जाधव, रमेश राठोड, पोलिस शिपाई सुनील पंडागळे, चापोउपनिरीक्षक रविंद्र शिरामे, चोपोशि राजेश जाधव तसेच पोफाळी पोलिस ठाण्याचे सफौ प्रल्हाद राठोड सहभागी होते.

# अध्यात्माच्या वाटेवर 'वसुंधरा'चा जागर

## सुकळी येथे पायी दिंडीचे उत्साहात स्वागत; आमदार किसनराव वानखेडे यांच्या हस्ते वृक्षारोपण

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**उमरखेड :** अध्यात्मासोबत पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणाऱ्या 'वसुंधरा पायी दिंडी २०२६'चे सुकळी (ज.) येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेने नागपूरच्या पूर्व विदर्भ उपपीठातून श्रीक्षेत्र नाणीजधामकडे निघालेल्या दिंडीत हजारो भाविक सहभागी झाले आहेत.

दि. ११ सप्टेंबर रोजी श्रीक्षेत्र मोहगाव झिल्पी, ता. हिंगणा, जि. नागपूर येथून दिंडीचे प्रस्थान झाले. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करीत दिंडी २१ ऑक्टोबर रोजी नाणीजधाम येथे पोहोचणार आहे. याच दिवशी जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांचा ६० वा वाढदिवस साजरा होणार आहे.

सुकळी येथे दिंडीचे आगमन होताच भाविकांनी स्वागत केले. आमदार किसनराव वानखेडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर गुरु पूजन व महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. यावेळी भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, काँग्रेसचे गोपाल अग्रवाल, सरपंच श्रद्धा बोके, माजी सरपंच शिवाजी रावते, शेख जहांगीर, अशोक वानखेडे, अमानपूरचे सरपंच बाबुलाल जाधव यांच्यासह जगद्गुरु नरेंद्राचार्य संप्रदाय जिल्हा सेवा समिती, यवतमाळ पश्चिमचे पदाधिकारी व सेवेकरी उपस्थित होते.

दिंडीच्या मार्गावर दररोज वृक्षारोपणासह स्वच्छता केली जात आहे. भाविकांसाठी पाणी, भोजन, निवास, वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, दोन पाण्याचे टँकर आणि स्वतंत्र स्वच्छतागृह वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. शिस्तबद्ध पद्धतीने सुरू असलेली हजारो भाविकांची वाटचाल लक्षवेधी ठरत आहे.

आयोजकांच्या माहितीनुसार, वृक्षारोपण, रक्तदान आणि मरणोत्तर देहदानाच्या माध्यमातूनही सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. 'वृक्ष वाचवा, वसुंधरा वाचवा आणि मानवता जपा' हा संदेश देत दिंडी नाणीजधामकडे मार्गस्थ झाली.

# नॅचरल शुगरचे यंदा ७.५० लाख टन गाळपाचे उद्दिष्ट

## ११ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा; बायो-सीएनजी प्रकल्पाचेही लोकार्पण

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**महागाव :** गुंज-सवना येथील नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड, युनिट क्रमांक २ च्या ११ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा सोमवारी (२१ सप्टेंबर) उत्साहात पार पडला. मागील गळीत हंगामात सर्वाधिक ऊसतोडणी व वाहतूक करणारे कंत्राटदार सुदर्शन धोंडबाराव शिंदे व त्यांच्या पत्नी रूपाली शिंदे यांच्या हस्ते अग्निप्रदीपन करण्यात आले. कृषीरत्न बी. बी. ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास संचालक पांडुरंग आवाड, प्रवर्तक श्रीपाद ठोंबरे, एनसाई मल्टिस्टेटचे संचालक बाळासाहेब टेळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बी. बी. ठोंबरे यांनी सांगितले की, मागील हंगामात सर्वांच्या सहकार्याने नॅचरल शुगरने विदर्भात उच्चांकी पाच लाख ५५ हजार मेट्रिक टन उसाचे गाळप केले. गाळपासाठी आलेल्या उसाला एफआरपीनुसार दर देण्यात आला. यंदा शेतकऱ्यांनी कारखान्याकडे ९ हजार ९९४ हेक्टर क्षेत्राची ऊस नोंद केली असून, सात लाख ५० हजार मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

यंदाच्या हंगामासाठी सक्षम ऊसतोडणी व वाहतूक यंत्रणा उभारण्यात आली असून दररोज किमान पाच हजार ५०० मेट्रिक टन उसाचे गाळप करण्याचे नियोजन आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात गळीत हंगामाचा शुभारंभ होणार आहे.

गाळप क्षमता वाढल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ऊस लागवड करावी, असे आवाहन करण्यात आले.

दरम्यान, युनिट क्रमांक २ येथे नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या बायो-सीएनजी प्रकल्पाचेही मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सुधारित ऊस जातींची प्रमाणित रोपे तसेच सेंद्रिय खत सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमास माजी संचालक सीताराम ठाकरे, गोविंदराव शिंदे, टिकाराम कदम, देविदास पाटील, तानाजी जाधव, नानाराव पुंडे, सुनील भवानकर यांच्यासह शेतकरी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# एसडीपीओ पथकाची मटका अड्ड्यावर धाड

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**राळेगाव :** वडकी येथील मटका जुगारावर उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाने सोमवारी दुपारच्या सुमारास धाड टाकून कारवाई केली. यावेळी पथकाने तिघांना ताब्यात घेत १७ हजार २१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वडकी येथील साईराम हॉटेलच्या बाजूला मटका जुगार सुरू असल्याची माहिती पांढरकवडा उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाला मिळाली. त्यावरून पथकाने सापळा रचून धाड टाकली. यावेळी रोख व मटका जुगाराचे साहित्य जप्त केले. किरण बाबाराव शेजूळ रा. वडकी, गणेश उत्तम आत्राम रा. कोसरसार, ता. वरोरा, अरुण भोयर रा. वडनेर, ता. हिंगणघाट यांना ताब्यात घेत पुढील कारवाईसाठी पोलिसांच्या स्वाधीन केले.

# तलाठ्यांची मुख्यालयाकडे पाठ?

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**कळंब :** तालुक्यातील मेटीखेडा मंडळात कार्यरत तलाठ्यांच्या मुख्यालयी अनुपस्थितीमुळे नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी हेलपाटे मारावे लागत असल्याची तक्रार समोर आली आहे. तलाठ्यांनी आपल्या साजाच्या मुख्यालयी वास्तव्य करणे अपेक्षित असताना संबंधित कर्मचारी नियमितपणे उपलब्ध नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सातबारा उतारे, शेतीविषयक दाखले, उत्पन्नाचे दाखले तसेच विविध शासकीय कागदपत्रांसाठी नागरिकांना तलाठी कार्यालयात जावे लागते. मात्र, तलाठी वेळेवर उपलब्ध नसल्याने अनेकांना रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आठवड्यातून एखाद-दुसऱ्या दिवशी कार्यालयात येऊन काही वेळातच निघून जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. शाळा-महाविद्यालयांतील प्रवेश, शिष्यवृत्ती तसेच विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे मिळविताना विद्यार्थ्यांसह पालकांचीही मोठी गैरसोय होत आहे. ऐनवेळी तलाठी उपलब्ध होत नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना पुन्हा कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. मुख्यालयी वास्तव्याबाबतच्या शासकीय नियमांची अंमलबजावणी करून संबंधित तलाठ्यांची चौकशी करावी, अशी मागणी शेतकरी, नागरिक व तरुणांकडून होत आहे. तहसीलदार धीरज स्थूल यांनी या प्रकरणाची दखल घेऊन वस्तुस्थिती तपासावी आणि दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीवर तहसील प्रशासनाकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे मेटीखेडा मंडळातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यातील शेतकरी कर्जमुक्तीचे उद्दिष्ट्य पूर्ण करून शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज द्या - पालकमंत्री

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अमरावती:** जिल्ह्यात दोन टप्प्यात 86 हजार 447 शेतकऱ्यांना कर्जमुक्ती जाहीर झाली आहे. त्यातील मयत व अन्य कारणांमुळे केवायसी राहिलेल्या जवळपास 18 हजार शेतकऱ्यांची एक महिन्यात केवायसी पूर्ण करावी. यासाठी स्थानिक आमदारांची मदत घेऊन याद्या तयार करा अशा सूचना करत शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या सूचना आज महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यंत्रणांना दिल्या. तसेच, जिल्ह्यात शेती व सार्वजनिक उपयोगासाठी वीज अखंड उपलब्ध होण्याकरिता



महावितरण कंपनीने तातडीने यंत्रणा सुधार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

नियोजन भवनात पालकमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली कर्ज माफी व पीक कर्ज संदर्भात अग्रणी बँकांची आणि महावितरणची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'अंतर्गत दोन टप्प्यात कर्जमाफी जाहीर झाली आहे. यासंदर्भात याद्या प्रसिद्ध झाल्या आहेत. मात्र यातील काही शेतकऱ्यांना मालक शेतकरी मयत झाल्याने व अन्य तांत्रिक कारणांमुळे केवायसी झाली नसल्याने कर्जमाफी झाली नसल्याचा विषय तातडीने सोडविण्याच्या सूचना श्री. बावनकुळे यांनी यावेळी केल्या. यासाठी तातडीने जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघ निहाय केवायसी मुळे लाभला मिळालेल्या शेतकऱ्यांची यादी तयार करून तलाठ्यांच्या माध्यमातून त्यांना नोटीस देण्यात याव्या, स्थानिक आमदारांनी यात स्वतः लक्ष घालून हा विषय प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी समन्वय अनेक कार्य करून महिनाभरात निकाली काढण्याचे निर्देशांनी दिले.

या कामात बँकांनी कुठल्याही पद्धतीने दिरंगाई किंवा कुचराई करता कामा नये. बँकांनी मयत शेतकऱ्यांचा वारस लावून त्यास लाभ देणे गरजेचे आहे. त्याकरिता तहसीलदार यांच्याकडून देण्यात येणारे वारसदाराचे प्रमाणपत्र प्रमाण मानून कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. कामात दिरंगाई केल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांवर गुन्हे दाखल करावे असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

जिल्ह्यात शेती व सार्वजनिक उपयोगात येणारी वीज सतत खंडित होत असल्याच्या तक्रारी पाहता उचित यंत्रणा राबवून ग्राहकांना अखंडित वीस पुरवठा करण्याचे निर्देश बावनकुळे यांनी महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. ज्या ठिकाणी विद्युत रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) उभारण्याची गरज आहे तेथे ती उभारावी व त्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

# पोलीस स्टेशन राजापेठ येथील दाखल प्राणघातक हल्या मधील 4 विधी संर्घषित बालके ताब्यात

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अमरावती:** पोलीस स्टेशन राजा पेठ येथील दाखल प्राणघातक हल्या मधील ४ विधी संर्घषित बालक यास तात्काळ ताब्यात घेतले आहे. अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट-२ ची कारवाई केली.

२०/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन राजापेठ येथे फिर्यादी शितल सागर परतेकी, वय २५ वर्ष, रा. जेवड नगर, अमरावती यांनी तक्रार दिली की, रात्री अंदाजे १९.३० वाजता फिर्यादीचे पती हे नेहमीप्रमाणे साई पाइप एमआयडीसी येथील कंपनीमध्ये काम करण्याकरीता रिक्षाने घरुन गेले होते. रात्री २०.१५ वाजता दरम्यान कोठारी कंपनी समोरील सतीश कँटीन जवळ फिर्यादीचे पती सागर परतेकी यांच्या ओळखीचे ४ विधीसंघर्षीत बालक यांनी फिर्यादीचे पती सागर परतेकी यांना थांबवुन दारु पिण्याकरीता पैसे मागीतले त्यांनी सांगीतले की माझयाकडे पैसे नाहीत यावरुन विधीसंघर्षीत बालक यांनी पकडा रे साल्याला, मारुन टाकु असे म्हणुन ४ ही विधीसंघर्षीत बालक यांनी जखमीस पकडुन पोटावर चाकुने वार करूण जिवे मारण्याच्या उददेशाने हल्ला केला. अशा फिर्यादीचे जबानी रिपार्ट वरून पोलीस स्टेशन राजापेठ येथे अप के ८१६/२०२६ कलम १०९ (१), ३(५), भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाची माहीती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांना मिळताच गुन्हे शाखेच्या पथकासह घटनास्थळी भेट देवुन सदर गुन्हयाची माहती घेवुन गुन्हे शाखेचे दोन पथक तयार करूण आरोपी यांचा शोध घेवुन ताब्यात घेण्याबाबत तात्काळ पथक रवाणा केले होते. सदर गुन्हयाचा संमातर तपास करीत असतांना गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय बातमीदारा कडुन खात्रीशीर माहीती मिळाली की सदरचा गुन्हा हा संजयगांधी नगर तसेच बेनोडा येथील ४ विधी संर्घषित बालक यांनी केला आहे यावरूण तात्काळ गुन्हे शाखेचे पथकाने महादेव खोरी जंगल परीसरात जावुन ४ विधी संर्घषित बालक यांचा शोध घेवुन ताब्यात घेतले व पुढिल तपास कामी पोस्टे राजापेठ यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायूक्त परिमंडळ १ यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परिमंडळ २ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय (गुन्हे) प्रांजली सोनवणे, सपोआ निलेश ब्राम्हणे (गुन्हे) यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर, पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, दिपक सुंदरकर, मंगेश परिमल, मनोज ठोसर, सचिन बाहाळे, जहीर शेख, अतूल संभे, नईम बेग, विकास गूडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन गुल्हाणे, चालक संदीप खंडारे, अश्विन यादव (सायबर) यांनी केली आहे.

# विशेष पोलिस महानिरीक्षक यांच्या हस्ते अंजनगाव सुर्जी व वरुड पोलिसांना मोटार सायकली वाटप

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अमरावती :** पोलिस दलाची कार्यक्षमता वाढविणे, ग्रामीण भागातील गस्त अधिक प्रभावी करणे तसेच नागरीकांना तात्काळ पोलिस मदत उपलब्ध करुण देण्याचे उददेशाने महाराष्ट्र पोलिस दलामार्फत पोलिस स्टेशन ला मोटार सायकल (चार्ली कंमाडो मोबाईल) उपलब्ध करुण देण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने १५/०९/२०२६ रोजी मा.श्री. डॉ. महेश पाटील, विशेष पोलिस महानिरीक्षक, परिक्षेत्र अमरावती यांचे हस्ते पोलिस स्टेशन अंजनगाव सुर्जी यांना २ तसेच पोलिस स्टेशन वरुड यांना २ अशा एकुण ४ मोटार सायकल (चार्ली कंमाडो



मोबाईल) उपलब्ध करुन देण्यात आल्या.

सदर मोटार सायकलचा उपयोग पोलिस स्टेशन हददीमध्ये दैनंदिन गस्त, संवेदनशिल ठिकाणी पेट्रोलिंग, कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे प्रतिबंध उपाययोजना तसेच आपात्कालिन परीस्थितीत तात्काळ घटनास्थळी पोहोचण्यासाठी करण्यात येणार आहे. वरील मोटार सायकली (चाली कंमाडो मोबाईल) वाटप कार्यक्रमावेळी डॉ. महेश पाटील, विशेष पोलिस महानिरीक्षक, परिक्षेत्र अमरावती, निकेदन कदम, पोलिस अधिक्षक अमरावती ग्रामीण, दत्ता तोटेवाड, अपर पोलिस अधिक्षक, अमरावती ग्रामीण तसेच सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी व सर्व पोलिस स्टेशनचे ठाणेदार अमरावती ग्रामीण यांची उपस्थिती होती.

# माजी खासदार नवनीत राणा दर्यापूर न्यायालयात हजर

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**दर्यापुर :** तालुक्यातील खल्लार येथील जाहीर सभेत भाजपा नेत्या माजी खासदार नवनित राणा यांच्यावर विशिष्ट समुदायाकडुन झालेल्या प्राणघातक हल्याच्या संदर्भात नवनीत राणा यांनी खल्लार येथील पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारीनुसार कार्यवाहीकरीता दर्यापुर येथील न्यायालयात झाल्या हजर झाल्या.

लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान झालेल्या कथित प्राणघातक हल्ल्याप्रकरणी न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाली आहे. 2024 च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान दर्यापूर तालुक्यातील खल्लार येथे आयोजित जाहीर सभेदरम्यान भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत रवि राणा यांच्यावर

## खल्लारीतील निवडणूक प्रकरण



झालेल्या कथित प्राणघातक हल्ल्याप्रकरणी त्यांनी खल्लार पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारीनुसार पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी त्या दर्यापूर येथील न्यायालयात हजर राहिल्या. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान खल्लार येथे जाहीर सभा सुरू असताना नवनीत राणा यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. या घटनेनंतर त्यांनी खल्लार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करून संबंधित आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली होती. सदर प्रकरणाची न्यायालयीन प्रक्रिया सुरू असून, त्याच अनुषंगाने नवनीत राणा न्यायालयात हजर राहिल्या.

यावेळी संबंधित प्रकरणातील न्यायालयीन कार्यवाही करण्यात आली. या प्रकरणात कायद्यानुसार दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कठोरात कठोर कारवाई व्हावी, अशी भूमिका नवनीत राणा यांनी यावेळी व्यक्त केली.

निवडणूक प्रचारादरम्यान लोकप्रतिनिधी किंवा कोणत्याही नागरिकावर अशा प्रकारचा हल्ला होणे ही गंभीर बाब असून, अशा घटनांमध्ये कायद्याचे राज्य अबाधित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास निष्पक्षपणे होऊन दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे नवनीत राणा यांनी सांगितले.

दरम्यान, या प्रकरणातील न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोषींवर कायद्यानुसार कठोर शिक्षा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने अंतिम निर्णय न्यायालयाकडूनच होणार असून, पुढील सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. खल्लार येथील या प्रकरणामुळे 2024 च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान घडलेल्या घटनेची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून, न्यायालयीन प्रक्रियेतून या प्रकरणाचा कायदेशीर निकाल लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी विनोद गुहे, अविनाश काळे, अजय देशमुख, संजय भारसाकळे, अमोल कोरडे,किरण श्रीराव, अंकुश रहाटे, राहुल पाटील गावंडे, गोपाल यादव, श्रीकृष्ण अण्णा डोंगरे, समिक्षा साखरे, शैलेश मेटकर भाजपाचे मदन पाटील बायस्कार, नरेंद्र कुंदलवार, अनिल बोंडे, मेघा भारती आदि उपस्थित होते.

# शहरातील कुख्यात गुंड स्थानबद्ध

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अमरावती :** कुख्यात गुन्हेगार श्रावण उर्फ छोटा डॉन राजेश बनारसे, वय 19 वर्ष रा.वरूण नगर, महादेव खोरी, अमरावती यास MPDA कायदयान्वये स्थानबध्द करण्यात आले.

राजेश बनारसे हा सन 2025 पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये सक्रिय आहे. त्याचे विरुध्द पोलीस स्टेशन फेजरपुरा, राजापेठ, नांदगाव पेठ अमरावती शहर तसेच पोलीस स्टेशन तिवसा, अमरावती ग्रामीण येथे खुन, जबरी चोरी, चोरी, आगळीक करणे, अश्लील करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे 08 गुन्हे दाखल आहे. त्याचेवर यापुर्वी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेले आहे. तसेच त्यास तडीपार सुध्दा करण्यात आले आहे तरी



सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सकीय आहे.

नमुद ईसमाविरुध्द वपोनि रविंद्र राजुलवार, पोलीस ठाणे फ्रेजरपुरा, अमरावती शहर, यांनी सपोआ. नयन आलुरकर, फेजरपुरा विभाग व पोलीस उपायुक्त परीमंडळ 1 यशवंत सोळंके, यांचे मार्फतीने पाठविलेल्या प्रस्तावाची पोलीस उपायुक्त. (मुख्यालय), प्राजंली सोनवणे, सपोआ निलेश ब्राम्हणे, गुन्हे विभाग आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, गुन्हे शाखा, प्रशासन यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एम.पी.डी.ए. सेल चे अधिकारी सपोनि इम्रान नायकवडे, पोउपनि, अजय मिश्रा, पोलीस अंमलदार, चेतन कराडे यांनी गोपनीय प्रस्ताव तयार केला. सदर प्रस्तावास मा. पोलीस आयुक्त, राकेश ओला यांनी दिनांक 20/09/2026 रोजी मान्यता देवुन आदेश पारीत केले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र राजुलवार यांचे मार्गदर्शनात परिमंडळ-1 कडील विशेष पथकातील पोउपनि मिलींद हिवरे व पथकातील अंमलदार सतिश देशमुख, सुभाष पाटील, मतीन शेख, सतिश पराळे, यांनी तसेच पोलीस ठाणेकडील डि.बि. पथकातील पोउपनि राहुल महाजन, पोलीस अंमलदार संदिप देशमुख, आनंद ठाकुर यांनी स्थानबध्दीचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेण्याची कामगीरी केली.

# नवनीत राणा यांचा जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्यासाठी कृषिमंत्र्यांना फोन

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**दर्यापूर :** अमरावती जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करत माजी खासदार सौ. नवनीत राणा यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी व व्यथा जाणून घेतल्या. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना तातडीने मदतीची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई द्यावी, यासाठी मा .खासदार नवनीत राणा यांनी कृषिमंत्री दत्तात्रय



भरणे यांना तातडीने दूरध्वनी करून परिस्थितीची माहिती दिली. दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली.

"शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू; कृषीमंत्री दत्तात्रय भरणे . नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करू," अशी भूमिका नवनीत राणा यांनी यावेळी व्यक्त केली.

# गणेश विसर्जनासाठी आमदार रवी राणा यांनी छत्री तलाव, दस्तुरनगर चौक परिसराची केली पाहणी



**अमरावती:** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्ती विसर्जनासाठी अमरावती महानगरपालिका व संबंधित प्रशासनाकडून करण्यात आलेल्या तयारीचा आमदार रवि राणा यांनी सोमवार, २१ सप्टेंबर रोजी पाहणी करून आढावा घेतला. छत्री तलाव तसेच दस्तुरनगर चौक परिसरातील विसर्जनाच्या नियोजनाची माहिती घेतली. गणेश विसर्जनाच्या दिवशी मोठ्या संख्येने गणेशभक्त व नागरिक विसर्जनस्थळी येत असल्याने नागरिकांची गैरसोय होऊ नये, वाहतुकीची कोंडी निर्माण होऊ नये तसेच विसर्जन प्रक्रिया सुरक्षित व सुरळीत पार पडावी, यासाठी महानगरपालिका प्रशासनाने केलेल्या तयारीची यावेळी पाहणी करण्यात आली. विसर्जनस्थळी आवश्यक असलेल्या विविध सुविधांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली. या पाहणीदरम्यान गणेश विसर्जनासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांनी आमदार रवी राणा यांना दिली. विसर्जनस्थळी करण्यात येणारी स्वच्छता व्यवस्था, आरोग्य विभागाची तयारी, नागरिकांसाठी आवश्यक सुविधा, अग्निशमन विभागाची सज्जता तसेच प्रशासनाच्या विविध विभागांमध्ये करण्यात आलेला समन्वय याबाबत माहिती देण्यात आली.

# आदिशक्ती साहित्य संमेलन संपन्न

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

## ग्रामाचे वास्तवचित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य.... डॉ. श्रीकांत पाटील

**अमरावती:** ग्रामा मधील माणूस ,त्याचे जगणे,श्रम, दुःख, आशा आकांक्षा, निसर्गाशी असलेले नाते, शेतीचेप्रश्न ,दुष्काळ पाऊस, कर्ज ,बाजारपेठ स्थलांतर ,आदिंचे सर्वांगीण वास्तव चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य होय अशा आशयाचे उद्गार डॉ. श्रीकांत पाटील यांनी काढले. आदिशक्ती बहुउद्देशीय संस्था अमरावतीच्या वतीने तिसऱ्या आदिशक्ती मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन विमलाबाई देशमुख महाविद्यालयात करण्यात आले होते या प्रसंगी संमेलना ध्यक्ष म्हणून बोलताना त्यांनी वरील विचार व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले ग्रामीण साहित्याने शहरात बसलेल्या वाचकाला गावातील मातीचा गंध दिला, शेतकऱ्याच्या कपाळावरचे घामाचे थेंब आणि शेतमजुरांच्या हातावरील घट्टे दाखवले. पावसाकडे आशेने पाहणारे शेतकऱ्याचे डोळे दाखवले. आज शेती बदलली आहे शेतीसमोर नवे प्रश्न उभे आहेत. शेतमालाला योग्य भाव नसणे, पाणीटंचाईचे संकट, जमिनीचे तुकडेकरण मूलभूत सुविधांचा अभाव या सर्वांचे दस्तऐवजीकरण ही ग्रामीण साहित्याची जबाबदारी आहे. संमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक, जगद्गुरु तुकोबाराया साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ यांनी केले ते म्हणाले मराठी साहित्यात अमरावतीचे विशेष योगदान आहे अमरावतीचे उद्धव शेळके यांनी मराठीच्या पहिल्या पाच कादंबऱ्यात येणारी धग कादंबरी दिली. अमरावतीच्या मधुकर केचे यांनी तुकारामानंतर श्रेष्ठ दर्जाचा अभंग व ग्रामीण ललित निबंध दिला. डॉ. सुभाष सावरकर यांनी मराठी साहित्याला जनसाहित्याची संकल्पना दिली. वसंत आबाजी डहाके प्रभा गणोरकर यासारखे प्रतिभावंत कवी दिले. हे वर्ष महात्मा जोतिराव फुले यांचे दिशताब्दी जन्मोत्सव वर्ष आहे महात्मा फुले महाराष्ट्रातील सामाजिक ,साहित्यिक व लोकशाही जनक्रांतीचे आद्य प्रवर्तक होते. त्यांनी मराठीत नव्या आशय अभिव्यक्तीचे साहित्य निर्माण केले. ते मराठीत देशी साहित्याचे जनक ग्रामीण साहित्याची जनसाहित्याची प्रेरणा होते. याप्रसंगी अमरावतीचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून आदिशक्ती संस्थेचे व साहित्य संमेलनाचे कौतुक करून सर्व प्रकारच्या सहकार्याचे आश्वासन दिले. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी स्वागतपर भाषण केले. यावेळी अतिथी म्हणून प्रसिद्ध समाजसेवक सुदर्शन गांग उपस्थित होते. त्यांनीही आपले विचार मांडले. संमेलनाच्या आयोजक डॉ. शोभा गायकवाड यांनी प्रास्ताविक भाषण केले. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मंदा नांदुरकर यांनी केले. यावेळी अतिथी म्हणून अशोकराव पाटील इस्लामपूर व किसन परशराम बोंद्रे ठाणे उपस्थित होते .विविध वांङमय प्रकारातील विजेत्यांना यावेळी परितोषिक वितरण करण्यात आले .

# रासेयो स्वयंसेवकांनी विद्यापीठाचा नावलौकीक उंचवावा - कुलगुरु डॉ. बारहाते

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अमरावती:** विद्यापीठाच्या रासेयो स्वयंसेवकांनी राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करुन विद्यापीठाच्या नावलौकीकात भर घातली असून निवड झालेल्या रासेयो स्वयंसेवकांनी यापुढेही असाच नावलौकीक मिळवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित विद्यापीठस्तरीय निवड चाचणी शिबीराचे उद्‌घाटन संपन्न झाले. त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. उद्‌घाटक म्हणून एनसीसी मुख्यालय, अमरावती येथील 8 महाराष्ट्र बटालियनचे ए.ओ. लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा, रासेयो



संचालक डॉ. निलेश कडू, अमरावती शहर रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. विशाल गजभिये, ग्रामीण समन्वयक डॉ. विकास देशमुख, यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निलिमा दवणे, वाशिम जिल्हा समन्वयक डॉ. अशोक वाघ, लेफ्टनंट प्रा. ऋषभ डहाके, कमांडन्ट डॉ. नितीन बनसोड आदी उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, 177 गुणवंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय फेरीत स्थान मिळविले आहे. यशाची पहिली पायरी विद्यार्थ्यांनी ओलांडली आहे. मागील वर्षी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत स्वयंसेवकांनी अनेक पारितोषिके जिंकली होती. आव्हान स्पर्धेचे विद्यापीठातील आयोजन लक्षवेधी ठरले. इतर विद्यापीठांच्या कुलगुरूंनी सुध्दा याचे कौतुक केले होते. संत गाडगे बाबांचे नांव असलेल्या या विद्यापीठाचे प्रतिनिधत्व करतांना सहभागी स्वयंसेवक सदैव शिस्त, उच्च मूल्य आणि जबाबदारीची जाणीव ठेवतील असे सांगून निवड चाचणीच्या निमित्ताने सर्व विद्यार्थी, प्रशिक्षक व मार्गदर्शक आपल्या क्षमतेची पूर्ण ताकद पणाला लावतील आणि विद्यापीठाचे नांव आणखी उज्वल करतील, असा आशावाद कुलगुरूंनी व्यक्त केला.

सर्वप्रथम प्रमुख अतिथी लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाल्याची घोषणा केली. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दीपप्रज्वलन आणि कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविकतेतून राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू यांनी विशेष शिबिर चाचणी आयोजनामागील भूमिका विषद केली. संचालन डॉ. निलिमा दवणे यांनी, तर आभार डॉ. विशाल गजभिये यांनी मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि. २२ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## बाप्पाच्या मांडवात लोककल्याणारी योजनांचा जागर...

गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणात शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमांतर्गत विशेष जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. आज दि.(२१) सप्टेंबर रोजी वाशिम येथील बालू चौक स्थित 'सरकार गणेशोत्सव मंडळा'च्या प्रांगणात महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजनांचा जागर करण्यात आला. प्रसंगी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले यांनी महिला आणि बालकांच्या सक्षमीकरण व संरक्षणासाठी राबवल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, मिशन वात्सल्य व बाल संगोपन योजना, सखी वन स्टॉप सेंटर व मिशन शक्ती, बेटी बचाओ, बेटी पढाओ व पोषण अभियान या प्रमुख योजनांबाबत सविस्तर माहिती दिली.या योजनांचा मुख्य उद्देश, पात्र लाभार्थी आणि त्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, याबाबत उपस्थितांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले. सरकार गणेशोत्सव मंडळ परिसरात पार पडलेल्या या कार्यक्रमाला महिला व नागरिकांची उपस्थिती होती. गणेशोत्सवाच्या लोकव्यासपीठाचा सकारात्मक वापर करत नागरिकांना थेट शासकीय योजनांची माहिती देण्याच्या या उपक्रमाला स्थानिक नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

# समृद्धीवाल्यांकडून मिळाली किंमत, सोलार काढण्याची नाही हिंमत !

## कुकसा धरणाच्या भिंतीवर खोदकाम करून सोलार; सांडव्याच्या भिंतीला भगदाड, तरी विभागाची बघ्याची भूमिका?

●प्रभाकर नाईकवाडे @ केनवड●

रिसोड तालुक्यातील कुकसा लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या धरणाच्या भिंतीवर खोदकाम करून उभारण्यात आलेल्या सोलार यंत्रणेचा मुद्दा आता चांगलाच ऐरणीवर आला आहे. धरणाच्या सुरक्षेशी संबंधित गंभीर बाब समोर असतानाही संबंधित लघुपाटबंधारे विभागाकडून सोलार हटविण्याची ठोस कारवाई होत नसल्याने विभागाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. समृद्धी महामार्गावरील झाडांसाठी धरणातून पाणीउपसा करण्यासाठी ही यंत्रणा उभारण्यात आल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात असून, धरणाच्या भिंतीवरच खोदकाम करण्याची परवानगी नेमकी कोणी दिली, हा सवाल उपस्थित होत आहे.

कुकसा धरणाच्या भिंतीवर सोलार यंत्रणा उभारण्यासाठी करण्यात आलेल्या खोदकामामुळे धरणाच्या संरचनेवर परिणाम होतो का, याची तांत्रिक तपासणी झाली आहे का, याबाबतही स्पष्टता नाही. धरणाच्या भिंतीवर कोणत्याही प्रकारचे काम करण्यापूर्वी संबंधित विभागाची परवानगी आणि तांत्रिक मंजुरी आवश्यक होती



का, ती घेण्यात आली होती का, याचा खुलासा लघुपाटबंधारे विभागाने करणे गरजेचे आहे.याचवेळी कुकसा प्रकल्पाच्या सांडव्याच्या भिंतीला भगदाड पडल्याचेही समोर आले आहे. एका बाजूला सांडव्याच्या भिंतीच्या दुरुस्तीचा प्रश्न गंभीर असताना दुसऱ्या बाजूला धरणाच्या भिंतीवर सोलारसाठी खोदकाम करूनही त्यावर कारवाई होत नसल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, सोलार यंत्रणा धरणाच्या भिंतीवरून हटविण्याची मागणी होत असतानाही ती अद्याप कायम का आहे? संबंधित विभागाला या यंत्रणेमुळे धरणाच्या सुरक्षेला कोणताही धोका नसल्याचे वाटत असेल, तर त्याचा तांत्रिक अहवाल जनतेसमोर का आणला जात नाही, असा सवालही उपस्थित होत आहे.दरम्यान, 'समृद्धीवाल्यांकडून विभागाला किंमत मिळाली म्हणून कारवाई होत नाही' अशी चर्चा आणि आरोप स्थानिकांमध्ये होत आहेत. मात्र या आर्थिक व्यवहाराची अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने त्याची सत्यता कागदपत्रे व चौकशीच्या आधारेच स्पष्ट होणे आवश्यक आहे. त्यामुळे सोलार बसविण्याची परवानगी, तांत्रिक मंजुरी, करार, शुल्क तसेच संबंधित आर्थिक व्यवहारांच्या नोंदी तपासण्याची मागणी होत आहे.

धरणाच्या भिंतीवर करण्यात आलेले खोदकाम नियमबाह्य असल्याचे आढळल्यास सोलार यंत्रणा तातडीने हटवून खोदकामाची योग्य पद्धतीने दुरुस्ती करावी, तसेच सांडव्याच्या भिंतीवरील भगदाडाची तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

धरणाची सुरक्षा महत्त्वाची की समृद्धी महामार्गाची सुविधा? कुकसा प्रकल्पातील सोलार यंत्रणेबाबत लघुपाटबंधारे विभाग आता नेमकी कोणती भूमिका घेणार आणि कारवाई करणार की पुन्हा डोळेझाक करणार, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

### जिल्ह्यात लघुपाटबंधारे विभाग, जलसिंचन विभाग, नावालाचं...

कुकसा धरणाच्या भिंतीवर सोलारसाठी करण्यात आलेल्या खोदकामाबाबत अद्याप लघुपाटबंधारे विभागाकडून कोणतीही ठोस उपाययोजना झाल्याचे निदर्शनास येत नाही. सोलार यंत्रणा हटविणे, खोदलेले खड्डे बुजविणे किंवा संबंधितांना लेखी नोटीस बजावणे याबाबतही अद्याप ठोस कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे धरणाच्या सुरक्षेचा प्रश्न कायम असताना विभागाची भूमिका नेमकी काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

### शिवसंग्रामकडून निवेदन, जलसमाधी आंदोलनाचा इशारा...

समृद्धी महामार्गावरील झाडांसाठी धरणातून पाणीउपसा? ठेकेदाराकडून पैशांची देवाणघेवाण झाल्याचा आरोप? लघु पाटबंधारे विभागातील कोणत्या अधिकाऱ्याने परवानगी दिली? शेतकरी हवालदिल; पावसाअभावी सोयाबीन, तूर पिकांचे नुकसान! शेतकऱ्यांच्या जमिनी धरणात गेल्या, मात्र त्यांना सिंचनासाठी पाणीउपसा उपलब्ध नाही; मग समृद्धी महामार्गावरील झाडांसाठी धरणातून पाणी का उपसले जात आहे? असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे. तर धरणाच्या संदर्भाच्या भिंतीला मोठे भगदाड पडले आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष नाही,या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, या मागणीसाठी शिवसंग्राम व कुकसा-जोगेश्वरी,केनवड,गणेशपूर, अंचळातील शेतकरी निवेदन देणार असून, जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**धनंजय पाटील बाजड** जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम, वाशिम



सिटी न्यूज सुपरफास्ट

कुकसा लघु प्रकल्पात १८ टक्के जलसाठा; विभागाने घेतल्या नोटा...

समृद्धी महामार्गाला पाणी उपसण्याचा दिला वाटा!

सिटी न्यूज सुपरफास्ट

लघुपाटबंधारे विभागाचा भोंगळ कारभार!

सिटी न्यूज सुपरफास्ट

लघुपाटबंधारे विभागाने पैसे गिळून डोळे झाकले;

समृद्धीवाल्यांनी धरणाच्या भिंतीवर खोदकाम करून सोलार ठोकले!

नियम आणि सुरक्षेवर गंभीर प्रश्न

सिटी न्यूज सुपरफास्ट बातमी खास, दखल हमखास

प्रकल्पातील पाणीउपसा करणारे

सोलार बंद; ठोकले कुलूप!

## थोडक्यात

### शिरपूर घटनेच्या निषेधार्थ दिगंबर जैन समाज आक्रमक!




● सिटी न्युज ब्युरो @ मालेगाव●

शिरपूर येथील अंतरिक्ष पार्श्वनाथ तीर्थक्षेत्रातील भगवान मुनिसुव्रतनाथ स्वामी यांच्या मूर्तीला बाधा आणून मूर्तीभंजन व विटंबना केल्याच्या आरोपाच्या निषेधार्थ मालेगावातील सकल दिगंबर जैन समाजाच्या महिला मंडळ व नवयुवक मंडळाच्या वतीने दि.२१ सप्टेंबर सोमवार रोजी तहसीलदार कार्यालय तसेच मालेगाव पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले या गंभीर घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली दि.१९ सप्टेंबर रोजी शिरपूर येथे घडलेल्या प्रकारात भगवान मुनिसुव्रतनाथ स्वामी यांच्या संगमरवरी मूर्तीचा डावा कान तोडून मूर्ती खंडित करण्यात आल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे.

तसेच मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवावी,अशी मागणीही करण्यात आली धार्मिक विषय संवेदनशील असल्याने कोणत्याही अफवांना वाव न देता प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी भूमिका सकल मालेगाव येथील सकल दिगंबर जैन समाज महिला मंडळ नवयुवक मंडळ व दिगंबर जैन समाजाने मंडळी असून निवेदनावर स्वाक्षरी महिला व नवयुवक मंडळ तसंच सकल दिगंबर जैन समाजाचे घटक त्या निवेदन देते वेळेस उपस्थित होते.

# जिल्ह्यात एकच चर्चा ; उबाठाचा आक्रोश मोर्चा !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

पश्चिम विदर्भातील शेतकरी कोरड्या दुष्काळाच्या संकटात सापडला असतांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी ठाकरे सेनेच्या वतीने आक्रोश मोर्चा काढण्यात आला . या मोर्चाची सुरवात दि. २१ सप्टेंबर रोजी वाशिममधून मधून करण्यात आली असून आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात हा मोर्चा काढण्यात आला आहे. शेतकरी आक्रोश मोर्चात मोठ्या संख्येने जिल्ह्यातील शेतकरी बांधव सहभागी झाले होते.

दि. २१ सप्टेंबर सोमवार रोजी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.वाशिम शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून मोर्चाला सुरुवात करून पुढे पाटणी चौक ,अकोला नाका मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकला.वाशिम जिल्ह्यात पावसाने मोठी दडी मारल्याने खरीप पिकांवर संकट आले आहे. अनेक भागांत सोयाबीन, तूर आणि कपाशीच्या पिकांना पावसाच्या खंडाचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, पीक नुकसान भरपाई जाहीर करावी आणि दुष्काळीवर उपाययोजना कराव्यात यासह विविध मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.तसेच ५ ऑक्टोंबर पर्यंत दुष्काळ जाहीर न केल्यास समृद्धी महामार्गावर आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला.





या मोर्चात ठाकरे सेनेचे उपनेते आमदार नितीन देशमुख यांच्यासह शिवसेना वाशिम जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, सुधीर कवर, कॅप्टन प्रशांत सुर्वे, नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### ऑन ड्युटी जेवायला गेल्याने आ. देशमुख निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर चांगलेच भडकले !



वाशीम मध्ये शेतकरी आक्रोश मोर्चात विविध मागण्यांसाठी हजारोंच्या संख्येने ठाकरेंच्या शिवसेनेचे पदाधिकारी आणि शेतकरी सहभागी झाले होते. मोर्चानंतर आ. नितीन देशमुख शिवसेना पदाधिकारी आणि शेतकरी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले. मात्र संबंधित अधिकारी कार्यालयात हजर नसल्याचे समजताच कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली.

यावेळी आ. नितीन देशमुख यांनी प्रशासनावर टीका करत, हजारो शेतकरी रस्त्यावर उतरले असतांना अधिकारी कार्यालयात उपस्थित नसणे हे शेतकऱ्यांप्रती असंवेदनशीलतेचे लक्षण असल्याचा आरोप त्यांनी केला. ऑन ड्युटी असताना अधिकारी जेवणासाठी गेले असल्याचे सांगण्यात आल्यानंतर कार्यकर्त्यांचा संताप आणखी वाढला.काही काळ वातावरण तणावपूर्ण राहिल्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे कार्यालयात आल्यावर साहेब ऑन ड्युटी तुम्ही जेवायला कोणत्या नियमाने गेले होते असा सवाल त्यांनी केला. मात्र निवासी उपजिल्हाधिकारी घुगे यांनी यावर दिलगिरी व्यक्त केली. त्यानंतर परिस्थिती निवळली.त्यानंतर ठाकरेचे आमदार नितीन देशमुख आणि शेतकऱ्यांनी आपले निवेदन प्रशासनाकडे सादर केले.

# वाशीम जिल्ह्यातील १९ बालकांच्या मोफत हृदयशस्त्रक्रियेसाठी मुंबईला रवानगी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये झालेल्या नियमित आरोग्य तपासणीमुळे जिल्ह्यातील १९ बालकांच्या हृदयातील गंभीर दोष वेळीच निदर्शनास आले आहेत. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या तपासणीनंतर जिल्हा रुग्णालयात विशेष 'द्विमितीय प्रतिध्वनी हृदयतपासणी' संदर्भ सेवा शिबिरात या बालकांची सखोल तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या वैद्यकीय तपासणीत या सर्व बालकांवर तातडीने हृदयशस्त्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक असल्याचे निष्पन्न झाले आहे.

शून्य ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची शाळा व अंगणवाड्यांमध्ये नियमित आरोग्य तपासणी जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येते. या तपासणीदरम्यान हृदयाशी संबंधित समस्या आढळलेल्या बालकांना पुढील सखोल तपासणीसाठी संदर्भित करण्यात आले होते. त्यानुसार जिल्हा रुग्णालयातील विशेष तपासणी शिबिरानंतर १९ बालकांच्या हृदयात गंभीर दोष असल्याचे स्पष्ट झाले.आर्थिक परिस्थितीमुळे महागड्या उपचारांचा खर्च परवडणे शक्य नसलेल्या कुटुंबांना शासनाच्या आरोग्य योजनांमुळे मोठा आधार मिळाला आहे. 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत या १९ बालकांवर संपूर्ण मोफत उपचार व हृदयशस्त्रक्रिया करण्यासाठी त्यांना २० सप्टेंबर रोजी मुंबईला रवाना करण्यात आले.



### सेवा संकल्प अभियान

'आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना' यांच्या माध्यमातून भायखळा, मुंबई येथील बालाजी रुग्णालयात या बालकांवर उपचार केले जाणार आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली या बालकांना उपचारासाठी मुंबईला रवाना करण्यात आले. आपल्या पाल्याच्या हृदयावरील शस्त्रक्रियेचा संपूर्ण खर्च शासनाच्या माध्यमातून होणार असल्याने पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. वेळेत झालेली तपासणी, अचूक निदान आणि उपचारासाठी करण्यात आलेली पुढील जलद कार्यवाही यामुळे या बालकांना आवश्यक वैद्यकीय उपचार मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.या प्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, बाह्यरुग्ण संपर्क अधिकारी डॉ. प्रसाद शिंदे, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक आकाश ढोके, जिल्हा कार्यक्रम सहाय्यक तुषार ढोबळे, प्रदीप भोयर, संगीता राजुरकर आणि सविता राठोड यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# गणेशोत्सव काळात 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियान पिंप्री सरहद्द येथे आरोग्य शिबिरांचे आयोजन

●प्रभाकर नाईकवाडे @ केनवड●

गणेशोत्सव म्हणजे भक्ती, उत्साह आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव. याच उत्सवाला आरोग्य जनजागृतीची जोड देत 'श्रीगणेशा आरोग्याचा अभियान २०२६' राबविण्यात येत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, केनवड यांच्या वतीने या अभियानांतर्गत नागरिकांना विविध शासकीय आरोग्य योजनांची माहिती मिळावी, तसेच प्राथमिक आरोग्य तपासणी व आवश्यक उपचाराची सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने सार्वजनिक गणेश मंडळांच्या सहकार्याने आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

**पिंपरी सरहद्द येथे आरोग्य तपासणीचा श्रीगणेशा**

श्री संत सावता माळी गणेश मंडळ, पिंपरी सरहद्द येथे मंडळासमोर आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. या शिबिरात नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार रक्त तपासणी, ईसीजी, औषधोपचार तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली.



या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करण्यासोबतच गरजू रुग्णांना आवश्यक उपचार मिळवून देणे आणि शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देण्यावर भर देण्यात येत आहे.गणेशोत्सवाच्या निमित्ताने 'भक्तीसोबत आरोग्याचीही काळजी' हा संदेश देत जय भवानी गणेश मित्र मंडळासमोर सुरू करण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी उपक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.या उपक्रमाला मेडिकल ऑफिसर मनीषा उदगीरे, आरोग्य सेवक बाजड, आरोग्य सेवक नप्ते, श्रीमती शिरसाठ (आरोग्य सेविका), शोभाताई गवई (मदतनीस), मुक्ता भांदुर्गे (आशा सेविका), रेखाबाई गवळी (अंगणवाडी सेविका) आणि रन्तमाला ठोकरे (अंगणवाडी सेविका) यांची उपस्थिती होती.

# कमळजा माता मंदिर वाचवा! लोणारमध्ये भक्तांचा एल्गार

## रस्ता रोको आंदोलनाने प्रशासनाचे धाबे दणाणले! पुरातत्त्व व पर्यटन विभागाच्या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते मागे

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**लोणार:** लोणार सरोवरातील वाढत्या पाणीपातळीमुळे जगप्रसिद्ध विवरातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा असलेल्या कमळजा माता मंदिराच्या अस्तित्वाचा आणि सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. च्आमच्या कमळजा मातेचे मंदिर वाचवा!ज्् असा आक्रोश करत आज कमळजा माता भक्तांनी लोणार येथे तीव्र रस्ता रोको आंदोलन केले. सरोवराच्या पाणीपातळीत सातत्याने होणाऱ्या वाढीमुळे मंदिर पाण्याभोवती वेढले गेले असून, त्याच्या प्राचीन संरचनेला मोठा धोका निर्माण झाला आहे. भक्तांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासकीय यंत्रणेची चांगलीच धावपळ उडाली. आंदोलनाची भीषणता पाहून तहसीलदार, पुरातत्त्व विभाग (रस्द्ध) आणि पर्यटन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तातडीने आंदोलनस्थळी दाखल झाले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी प्रशासनासमोर केवळ आश्वासनांवर समाधान मानणार नसल्याची भूमिका स्पष्ट करत आपल्या प्रमुख मागण्या मांडल्या. कमळजा माता मंदिर तातडीने सुरक्षितपणे पाण्याबाहेर काढावे, तसेच सरोवरात येणाऱ्या गोड्या पाण्याच्या प्रवाहांचा वैज्ञानिक अभ्यास करून वाढत्या पाणीपातळीवर तातडीने तांत्रिक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी भक्तांनी केली. केवळ बैठका किंवा अभ्यासाच्या नावाखाली वेळकाढूपणा न करता प्रशासनाने काय करणार, कधी करणार आणि कोणत्या विभागामार्फत करणार, याची स्पष्ट तारीख व वेळबद्ध कृती आराखडा जाहीर करावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली. तसेच या कामासाठी तहसील प्रशासन, पुरातत्त्व विभाग, वन विभाग, पाटबंधारे विभाग आणि तज्ज्ञांची संयुक्त कृती यंत्रणा तयार करून, कमळजा माता मंदिरासोबतच पाण्याखाली गेलेल्या सरोवरातील इतर प्राचीन मंदिरांचेही संरक्षण करावे, कारण हा केवळ एका मंदिराचा नसून लोणारच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचा प्रश्न आहे, असे भक्तांनी ठामपणे सांगितले.अखेर, अधिकाऱ्यांनी मंदिराच्या संरक्षणासाठी आवश्यक ती सर्व कायदेशीर व तांत्रिक कार्यवाही करण्याचे ठोस आश्वासन दिल्यानंतर भक्तांनी हे रस्ता रोको आंदोलन तात्पुरते मागे घेतले. मात्र, आंदोलन मागे घेतले असले तरी भक्तांमधील संताप कायम आहे. "प्रशासनाने आश्वासन देऊन आम्हाला केवळ आंदोलन मागे घ्यायला लावले असेल आणि नवरात्रीपूर्वी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नाही, तर यापुढील आंदोलनाची दिशा आणि तीव्रता प्रशासनाने कल्पनाही केली नसेल अशा पद्धतीची असेल," असा कडक इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. त्यामुळे आता नवरात्रीपूर्वी प्रशासन दिलेला शब्द पाळणार की भक्तांचा रोष ओढवून घेणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पदाचा गैरवापर करुन खोटा गुन्हा दाखल करणाऱ्या ठाणेदार सुरेंद्र अहेरकर यांना निलंबित करा

## पत्रकार बांधवांची एसडीओ व डीवायएसपींकडे निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**खामगाव :** येथील पत्रकार ईश्वरसिंह ठाकूर यांच्याबाबत दिलेल्या फिर्यादीची कोणतीही शहानिशा न करता पदाचा गैरवापर करून कायद्याचे उल्लंघन करत अदखलपात्र गुन्हा दाखल करणाऱ्या खामगाव शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरेंद्र अहेरकर यांना निलंबित करावे तसेच तात्काळ खोटा गुन्हा खारीज करावा अशी मागणी खामगाव येथील पत्रकार संघटना व पत्रकार बांधवांच्या वतीने एसडीओ व डीवायएसपींकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खामगाव येथील पत्रकार ईश्वरसिंह ठाकूर हे मागील अनेक वर्षापासून पत्रकारिता करीत आहेत. दरम्यान ९ सप्टेंबर रोजी युवा हिंदू प्रतिष्ठान महाराष्ट्र व मातृवंदन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष रोहित सूरजमल पगारिया यांनी उपविभागीय अधिकारी (महसूल) खामगाव यांना गुलजम्मा शाह यांच्यावर विविध न्यायालयात १८ प्रकरणे प्रलंबित व निकाली लागले असून त्याच्याविरुद्ध तडीपारीची कारवाई करण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन दिले होते. सदर निवेदनच्या सत्यप्रतच्या आधारे ११ सप्टेंबर २०२६ रोजी दैनिक भास्कर या वृत्तपत्रात बातमी प्रकाशित करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर गुलजम्मा शाह यांनी बदनामीकारक वृत्त प्रकाशित केल्याचा आरोप करत १६ सप्टेंबर रोजी खामगाव शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून खामगाव शहर पोलीस स्टेशनं चे ठाणेदार सुरेंद्र अहेरकर यांनी कोणतीही शहानिशा न करता व कायदेशीर बाबी न तपासता पत्रकार ईश्वरसिंह ठाकूर यांच्यावर सरळ अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. वास्तविक पाहता गुलजम्मा शहा यांच्यावर तडीपारची कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, व निवेदन तक्रार, मागणीला घेऊन आंदोलन असल्यास त्या आधारे पत्रकार बातमी प्रकाशित करून शासन प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे काम करत असतात. त्याच प्रकारे ईश्वरसिंह ठाकुर यांनी सुद्धा निवेदनाच्या आधारे बातमी प्रकाशित केली. मात्र, गुलजन्मा शहा यांच्या खोट्या आरोपावरून ठाणेदार सुरेंद्र अहेरकर यांनी पदाचा दुरुपयोग करत गुन्हा दाखल करून कायद्याचे उल्लंघन केले आहे. गुलजम्मा शहा यांचा बदनामी झाल्याचा आरोप असेल तर त्यांनी संबंधित वृत्तपत्राच्या संपादक, प्रकाशक यांना नोटीस देऊन कोर्टात दाद मागणे आवश्यक होते. त्यानंतर कोर्टात बदनामी झाल्याचे सिद्ध झाले असते तर थेट कोर्टानेच गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले असते.

# झोडगा येथे स्मशानभूमीत सरणावर बसून आंदोलन

## बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**मलकापूर :** बुलढाणा जिल्ह्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी तसेच मागील वर्षाचा प्रलंबित पीकविमा तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा, या मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवार, २१ सप्टेंबर रोजी मलकापूर तालुक्यातील झोडगा येथील स्मशानभूमीत 'आक्रोश अग्नी तांडव' आंदोलन करण्यात आले. यावेळी संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष नीलेश नारखेडे यांनी प्रतीकात्मक सरणावर बसून शासनाचे लक्ष वेधले. यंदा पावसाची अनिश्चितता, पिकांचे नुकसान आणि उत्पादनावर झालेला परिणाम यामुळे शेतकरी आर्थिक संकटात असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. बुलढाणा जिल्ह्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे संघटनेने म्हटले आहे.शासनाने या प्रश्नांकडे तातडीने लक्ष देऊन शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांची उपस्थिती

आंदोलनासाठी झोडगा येथे शेकडो शेतकरी उपस्थित होते. गावातून वाद्यांच्या गजरात आणि घोषणाबाजी करत मिरवणूक काढल्यानंतर स्मशानभूमीत आंदोलन करण्यात आले. बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत तातडीने द्यावी, अशी मागणी नारखेडे यांनी केली. तसेच मागील वर्षाचा प्रलंबित पीकविमा अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नसल्याने तोही तातडीने अदा करावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

# पीक नुकसानाची प्रत्यक्ष पाहणी करून अचूक पंचनामे करा!

## सहपालकमंत्री संजय सावकारे यांचे निर्देश

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**बुलढाणा :** पावसाच्या दीर्घ खंडामुळे पात्र खरीप पिकांवर झालेल्या परिणामाची शेतात जाऊन पाहणी करावी. नुकसानाचे अचूक पंचनामे पूर्ण करून पीकविमा कंपन्यांनी प्रशासनासोबत शेतकऱ्यांच्या भरपाईसाठी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश वस्त्रोद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे सहपालकमंत्री संजय सावकारे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात सोमवारी पीकस्थिती, संभाव्य पाणीटंचाई, पर्यटन, ऊर्जा, उद्योग आणि रोजगाराचा आढावा घेण्यात आला. मुदतपूर्व काढणीची वेळ आलेल्या पिकांची पाहणी व आवश्यक नोंदी वेळेत पूर्ण करण्यास सावकारे यांनी सांगितले. मदतीचे स्वरूप आणि पात्रता सर्वेक्षण व शासनाच्या निर्णयानंतर निश्चित होणार असली, तरी बाधित शेतकऱ्यांच्या अडचणी संवेदनशीलतेने हाताळण्याची सूचना त्यांनी केली. संभाव्य टंचाई लक्षात घेऊन पाणीपुरवठा योजना आणि टंचाई निवारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. सर्व विभागांनी परस्पर समन्वयातून प्रलंबित कामांना कालमर्यादा निश्चित करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीला आ. संजय गायकवाड, आ. चैनसुख संचेती, माजी आ. विजयराज शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात आणि पोलिस अधीक्षक निलेश तांबे उपस्थित होते. आ. मनोज कायंदे व आ. सिद्धार्थ खरात दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले.

### पर्यटनस्थळे जोडणार!

शेगाव, लोणार सरोवर, अंबाबरवा अभयारण्य आणि सिंदखेडराजा यांचा समावेश असलेला एकात्मिक पर्यटन परिपथ तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. शेगावमधील भाविक सुविधा, बाधित व्यापाऱ्यांचे पुनर्वसन तसेच अंबाबरवातील निवास आणि पायाभूत सुविधांना गती देण्यास सांगण्यात आले.

### रोजगाराचा आढावा

नवीन वीज उपकेंद्रांची कामे पूर्ण करणे, नादुरुस्त सौर कृषी पंपांची संबंधित कंपन्यांकडून दुरुस्ती आणि शेतातील वीजतार चोरीविरोधात विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीत सादर माहितीनुसार जिल्ह्यातील ८०५ उद्योगांमधून २,५७६ रोजगार निर्माण झाले आहेत.

# देवधाबा-बोदवड रस्त्याची दुरवस्था; खड्ड्यांच्या साम्राज्यामुळे नागरिक त्रस्त

## दुरुस्तीची जोरदार मागणी

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**मलकापूर:**जळगाव आणि बुलढाणा या दोन जिल्ह्यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा देवधाबा ते बोदवड हा मुख्य मार्ग सध्या खड्डयांच्या साम्राज्यात हरवला आहे. रस्त्याची झालेली अत्यंत दयनीय अवस्था आणि खड्डयांची चाळण झाल्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना, शेतमजुरांना तसेच विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहेत.

हा रस्ता दोन जिल्ह्यांमधील व्यापारी, शेती आणि दैनंदिन दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा दुवा आहे. मात्र, गेल्या काही काळापासून या रस्त्याची मोठी दुरवस्था झाली असून जागोजागी मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे. दररोज शाळेत व महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच शेतात जाणाऱ्या मजुरांना आणि स्थानिक नागरिकांना या खराब रस्त्यामुळे नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. एकीकडे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन विकासाचे दावे करत असताना, दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या या मुख्य मार्गाकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. या समस्येची गंभीर दखल घेऊन संबंधित प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी तात्काळ या रस्त्याचे काम हाती घेऊन दुरुस्ती करून द्यावी, अशी जोरदार मागणी देवधाबा व बोधवड परिसरातील गावांमधील नागरिकांनी केली आहे.

# शासकीय विश्राम गृह बुलढाणा येथे श्री तीर्थक्षेत्र अटाळी येथील युवकांचा शिवसेने मध्ये जाहीर पक्ष प्रवेश

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**खामगाव :** शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत,

केंद्रीय मंत्री शिवसेना नेते भूमिपुत्र खासदार प्रतापराव जाधव साहेब यांच्या खंबीर नेतृत्ववात,प्रमुख उपस्थितीमध्ये, व शुभहस्ते श्री तीर्थक्षेत्र अटाळी येथील समाजकार्यात नेहमी अग्रेसर असणारे युवा कार्यकर्ते ज्ञानेश्वर खेकडे,महादेव ,घोरपडे,राम गुळे,अभिषेक भाकरे,श्याम गुळे,तेजस सुलताने यांच्यासह युवकांचा शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश करण्यात आला या पक्षप्रवेश मुळे अटाळी क्षेत्रामध्ये शिवसेनेला मोठ्या प्रमाणात बळकटी मिळणार आहे,कारण खामगाव तालुक्यातील राजकारणातील केंद्रबिंदु म्हणून ओळख असणाऱ्या अटाळी गावामधून अनेक चढउतार घडविले आहेत, अशातच शिवसेना पक्षामध्ये युवकांनी केलेला पक्ष प्रवेशाला अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे,येत्या काही दिवसात युवक मोठ्या प्रमाणात शिवसेनेमध्ये पक्ष प्रवेश करणार आहेत. यावेळी उपस्थित शिवसेना बुलढाणा जिल्हा सह संपर्क प्रमुख शांताराम दाणे, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष डिवरे, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल भाऊ अंधारे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख पिंटूभाऊ धोरण,शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे,शिवसेना तालुकाप्रमुख मोताळा रामदास चौथंनकर शिवसेना उपतालुकाप्रमुख गोपाल भिल,शिवसेना उप तालुकाप्रमुख संतोष भाऊ दुतोंडे, शिवसेनेचे रवी भाऊ तिव्हाणे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी तथा कार्यकर्ते उपस्थित होते

# खामगाव बसस्टॅन्ड परिसरातील अतिक्रमणधारकांना पर्यायी जागा द्यावी

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांचे नगर परीषद मुख्याधिकारी यांना निवेदन

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**खामगांव :** शहरातील बस स्टँड परीसरात अतिक्रमण धारकावर रात्रीच्या वेळी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा निषेध करत सदर कार्यवाही पूर्णपणे थांबवून अतिक्रमणधारकांना पर्यायी जागा द्यावी किंवा योग्य जागेवर पुर्नवसन करण्यात यावे या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी यांना २१ सप्टेंबर रोजी निवेदन दिले. सदर निवेदनात नमूद आहे की, खामगाव शहरातील बस स्टँड परीसरात मागील कित्येक वर्षापासून छोटे मोटे उद्योग व व्यवसाय करुन आपल्या व आपल्या परीवाराची उदरनिर्वाह चालवत आहेत. या दुकानदारांवर नगर परीषद प्रशासनाव्दारे वारंवार कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे अशा व्यवसायींकावर उपासमारीची पाळी आलेली आहे. खामगांव शहरात दुष्काळ सदृष्य परीस्थिती असतांना व शहरातील अनेक सुशिक्षीत युवक शासकिय नोकरीच्या अभावी छोटेमोठे उद्योग करुन आपला व आपल्या परीवाराचे पोट भरत आहे. अनेकानी राष्ट्रीयकृत बँकेतून कर्ज घेवून आपले छोटेमोठे उद्योग सुरु केले आहे. या कार्यवाहीमुळे अनेक बँकाचे हप्ते थकुन शासनाचे मोठे नुकसान होणार आहे. नगर परीषद समोरील असलेला नप मालकीच्या असलेल्या मोठया भुखंडावर शहरातील छोट्यामोठ्या व्यवसायाकरणाऱ्या अतिक्रमण धारकाना ओटे व टिन शेड बांधून दिल्यास शहरातील अतिक्रमणावर कायमचा तोडगा निघू शकतो. ओबीसी महासंघाच्या वतीने तिव्र निषेध करण्यात येत आहे. तसेच पर्यायी व्यवस्था करुन दिल्याशिवाय शहरातील कोणत्याही अतिक्रमण धारकावर अन्याय होणार नाही यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघ अतिक्रमणधारकांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणार आहे असा इशाराही जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांनी निवेदनातून दिला आहे.

# एसटीची 'नशामुक्ती'; कर्तव्यापूर्वी मद्य चाचणी, ड्रग्जचीही तपासणी

## बुलढाणा जिल्ह्यातही अभियानाची होणार अंमलबजावणी; खासगी प्रवासी वाहनांवरही राहणार लक्ष

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**खामगाव :** 'नशामुक्त चालक, सुरक्षित प्रवास, सक्षम महाराष्ट्र' या संकल्पनेवर आधारित 'नशामुक्त एसटी महामंडळ' अभियान राज्यभर राबविण्यात येणार असून, त्याची अंमलबजावणी बुलढाणा जिल्ह्यातही केली जाणार आहे. एसटी चालकांच्या मद्यसेवनासोबतच अमली पदार्थाच्या सेवनाची तपासणी करण्यासाठी एकात्मिक यंत्रणा उभारण्यात येणार आहे. कर्तव्यावर जाण्यापूर्वी मद्य चाचणी, तसेच अमली पदार्थांची नियोजित आणि अचानक तपासणी करण्याची व्यवस्था केली जाणार आहे. एसटी महामंडळापुरते मर्यादित न राहता शासकीय वाहने, सार्वजनिक उपक्रम, शासनासाठी कार्यरत कंत्राटी वाहने तसेच खासगी बस, पर्यटन वाहने, टॅक्सी, ॲपआधारित कॅब, ऑटोरिक्षा, कंत्राटी प्रवासी वाहतूक सेवांमध्येही तपासणी व्यवस्था लागू करण्याचे नियोजन आहे. सार्वजनिक, खासगी प्रवासी वाहतूक सेवांमध्येही नशेतील वाहनचालकाला आळा घालण्यासाठी तपासणीला महत्त्व येणार आहे.

प्रवास सुरक्षित होणार

नशामुक्त चालक, सुरक्षित प्रवास'

राज्यातील रस्ते वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह करण्यासाठी २०२६ ते २०२९ या कालावधीत मद्य व अमली पदार्थ तपासणीला व्यापक स्वरूप देण्यात येणार आहे. जनजागृती, नियमित तपासणी, प्रतिबंधात्मक उपायांसोबतच आवश्यकतेनुसार समुपदेशन, उपचार व पुनर्वसनावरही भर दिला जाणार आहे.

### मद्य तपासणीसाठी एकात्मिक व्यवस्था

प्रवासी व मालवाहतूक सेवांमध्ये मद्य आणि अमली पदार्थ तपासणीसाठी आवश्यक कार्यपद्धती व मार्गदर्शक तत्त्वे विकसित केली जाणार आहेत. नियमित, नियोजित, आकस्मिक तसेच विशिष्ट घटना किंवा वाजवी संशयाच्या परिस्थितीत तपासणी करण्याची व्यवस्था प्रस्तावित आहे.

### डिटेक्शन किटचा वापर

अमली पदार्थांची प्राथमिक पातळीवर तत्काळ तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी किटचा प्रायोगिक वापर केला जाणार आहे. या किटच्या चाचण्यांचे प्रमाणीकरण करण्यात आले आहे.

नशेच्या प्रभावाखाली वाहन चालविण्यास प्रतिबंध करण्यासोबतच नियमित तपासणी, जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपायांमुळे प्रवासी वाहतूक अधिक सुरक्षित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. एसटीपासून खासगी बस, टॅक्सी, कॅब आणि ऑटोरिक्षांपर्यंत तपासणी लागू झाली.

### समुपदेशनालाही महत्त्व

'नशामुक्त चालक, सुरक्षित प्रवास, सक्षम महाराष्ट्र' अभियान केवळ तपासणीपुरते मर्यादित न ठेवता चालकांमध्ये व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती व समुपदेशन करण्यावरही भर दिला जाणार आहे.

चालकांच्या आरोग्याचीही घेतली जाणार काळजीप्रवासी वाहतुकीतील चालकांची जबाबदारी लक्षात घेऊन त्यांच्या आरोग्याशी संबंधित बाबींनाही अभियानात महत्त्व दिले जाणार आहे. या शासकीय सेवा आणि वाहनांचा समावेश महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस, शासकीय वाहने, सार्वजनिक उपक्रमांची वाहने, शासनासाठी कार्यरत कंत्राटी वाहने, या वाहनांच्या चालकांच्या तपासणीची व्यवस्था अभियानांतर्गत करण्यात येणार आहे.

# एस.टी. बसच्या धडकेत बाप-लेख गंभीर जखमी; चालकावर गुन्हा दाखल

**मलकापूर :** भरधाव व निष्काळजीपणे एस.टी. बस चालवून दुचाकीला मागून जोरदार धडक दिल्याने बाप-लेक गंभीर जखमी झाल्याची घटना दाताळा येथील माऊली वेल्डिंग वर्कसमोर घडली. या प्रकरणी तक्रारीवरून मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनला एस.टी. बस चालकाविरुध्द विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाताळा येथील रहिवासी प्रफुल्ल वसंत महाजन (वय ४८) हे १४ सप्टेंबर रोजी दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास आपल्या ताब्यातील मोटारसायकलने क्र. एमएच २८ जी ५३०२ मुलासह माऊली वेल्डिंग वर्कसमोर रस्त्याच्या खाली उभे होते. वेल्डिंग वर्कचे मालक प्रकाश निनाजी खर्चे यांच्याशी कामाबाबत बोलत असताना मलकापूरकडून दाताळाकडे जाणाऱ्या एस.टी. बस क्र. एमएच १४ एनई ९७७६ च्या चालकाने बस भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवून दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली.

# शिवसेनेच्या आक्रोश मोर्चा संदर्भात नांदुरा तालुका शिवसेनेची बैठक संपन्न

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**नांदुरा :** बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करा, पावसाअभावी करपलेल्या सोयाबीन व इतर पिकांचे त्वरित पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयाची मदत द्या या व आदी मागण्यांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने दि.३० सप्टेंबर २६ बुधवार रोजी शिवसेना उपनेते आ.नितिनबापु देशमुख, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये खामगाव येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे.

आक्रोश मोर्चा नियोजना संदर्भात आयोजित या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख गजानन वाघ तर प्रमुख उपस्थितीमध्ये सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, तालुकाप्रमुख ईश्वर पांडव यांची प्रमुख उपस्थिती होती. दि. ३० सप्टेंबर बुधवार रोजी होऊ घातलेल्या आक्रोश मोर्चामध्ये नांदुरा तालुका व शहरातून जास्तीत जास्त शिवसैनिक व शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाप्रमुख गजानन वाघ यांनी केले. यावेळी शिवसेना उपतालुकाप्रमुख विष्णू धोरण, उपतालुकाप्रमुख कैलास नेमाडे, उपतालुकाप्रमुख विनोद मानकर, उपतालुकाप्रमुख शिवदास वनारे, उपतालुकाप्रमुख यज्ञेश्वर पाटील, रघुनाथ घुळे, आप्पा सदावर्ते, पद्माकर पाटील तालुका संघटक, कैलास बघे, निलेश होनाळे, अर्जून तांगडे, पुरुषोत्तम सोनोने, सचिन जाधव, विजू पाटील सह शिवसेना, युवासेना, वाहतूक सेना तथा अंगीकृत संघटनांचे पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.




# रामदास पेठेतील युवा एकता नवदुर्गा उत्सव मंडळाचे भूमीपूजन संपन्न

## यंदा हार-फुलांऐवजी 'वही-पेन' देण्याचा अभिनव उपक्रम

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**अकोला:** आगामी नवरात्रोत्सवाच्या स्वागतासाठी आणि पूर्वतयारीसाठी शहरात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांना जोरदार सुरुवात झाली आहे. याच पार्श्वभूमीवर अकोल्यातील रामदास पेठ येथे युवा एकता रामदास पेठ नवदुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने आगामी नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून अत्यंत उत्साहात भूमीपूजन सोहळा संपन्न झाला.

रामदास पेठ येथे युवा एकता रामदास पेठ नवदुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने आगामी नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून अत्यंत उत्साहात भूमीपूजन सोहळा संपन्न झाला. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमात परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, तरुण कार्यकर्ते, तसेच विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख उपस्थितांमध्ये महापालिका सभागृह नेते पवन महल्ले यांच्यासह स्थानिक प्रतिष्ठीत नागरिक, तरुणांची मोठ्या संख्येत उपस्थिती होती. भूमीपूजन सोहळ्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना उपस्थितांनी सांस्कृतिक जतन, सामाजिक सलोखा आणि धर्मरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून सण आणि उत्सव आनंदात व एकात्मतेने साजरे करण्याचे आवाहन करण्यात आले. यंदाच्या नवरात्रोत्सवामध्ये युवा एकता रामदास पेठ नवदुर्गा उत्सव मंडळाने एक अत्यंत स्तुत्य, प्रेरणादायी आणि समाजोपयोगी उपक्रम हाती घेतला आहे. परंपरेनुसार देवीच्या दर्शनाला किंवा मंडळात जाताना पुष्पहार किंवा पुष्पगुच्छ आणले जातात; परंतु यंदा मंडळाने नागरिकांना एक आगळावेगळा संकल्प करण्याचे आवाहन केले आहे. यापुढे मंडळात येताना हार-फुलांऐवजी एक वही आणि एक पेन सोबत घेऊन यावे, असा निर्णय घेण्यात आला आहे. मंडळाच्या माध्यमातून हे गोळा केलेले शैक्षणिक साहित्य अशा विद्यार्थ्यांना वाटप केले जाईल. नऊ दिवस चालणाऱ्या या नवरात्रोत्सवात धार्मिक विधींसोबतच अनेक समाजकल्याणकारी उपक्रम राबवले जाणार आहेत. या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, जास्तीत जास्त नागरिकांनी या उत्सवात सहभागी होऊन देवीचे दर्शन घ्यावे आणि या सामाजिक प्रवाहात हातभार लावावा, अशी नम्र विनंती युवा एकता नवदुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

## वाहतूक शाखेच्या नाकाबंदीत चोरीच्या दोन मोटार सायकली जप्त



प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अकोला:** वाहतूक शाखेच्या नाकाबंदीत चोरीच्या दोन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या.

21 रोजी कारवाई करुन पोलिसांनी दोघांना अटक केली. अकोट फाईल पुलावर नाकाबंदी दरम्यान उगवा कडून येणारा सुरेंद्र सूरज राव रा. उगवा याच्या जवळ मोटार सायकल एम एच 40 एआर 4611 ही मिळून आली. त्यांच्या जवळ गाडीचे कोणतेही कागदपत्रे नव्हते. या गाडीची तपासाणी केली असता ती गाडी पोलीस स्टेशन सिटी कोतवाली मधील पोस्ट ऑफिस समोरून चोरीस 28/07/21 रोजी चोरीस गेलेली होती.तसेच दुसरी बिना नंबरची मोटारसायकल ही सिव्हिल लाईन उमरी परिसरातून फिर्यादी मयूर मोहळे याची 14/10/24 रोजी चोरीस गेलेली होती. युनिकॉर्न मोटार सायकलही जयसिंग इंगळे रा. खरप याच्या जवळून जप्त करण्यात आली. गाडी चालकास पुढील तपास करिता सिव्हिल लाईन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.या अगोदर 16/09/26 रोजी वाहतूक पोलिसांच्या नाकाबंदीत आरोपी सचिन अंबास्कर हरिहरपेठ याच्या जवळून 5 चोरीच्या मोटार सायकल जप्त करण्यात आल्या.

## एसटी तिकिटावर छुपा 'स्वच्छता अधिभार'; प्रवाशांना माहितीच नाही?

प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अकोला :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या प्रत्येक प्रवाशाच्या तिकिटावर 'स्वच्छता अधिभार' या नावाखाली दोन रुपये आकारले जात आहेत. मात्र, हा अधिभार नेमका कशासाठी आकारला जातो, त्याचा उपयोग कसा केला जातो आणि प्रवाशांना त्याबदल्यात कोणती सुविधा मिळणार, याची प्राथमिक व स्पष्ट माहिती प्रवाशांना दिली जात नसल्याने या आकारणीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

राज्यातील सर्वच बसस्थानकांवर तिकिटाच्या माध्यमातून हा स्वच्छता अधिभार आकारला जात असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे प्रत्येक प्रवाशाकडून दोन रुपये अशी रक्कम नियमितपणे वसूल होत असली तरी बहुतांश प्रवाशांना तिकिटावर स्वतंत्रपणे नमूद असलेल्या या आकारणीची माहितीही नसल्याचे चित्र आहे.

प्रवाशांकडून कोणतीही स्वतंत्र संमती न घेता आणि या शुल्काबाबत स्पष्ट जनजागृती न करता तिकिटातच रक्कम समाविष्ट केली जात असल्याने हा भार 'छुप्या पद्धतीचा' असल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रवाशांना तिकीट देताना किंवा बसस्थानकावर फलकांच्या माध्यमातून या अधिभाराबाबत स्पष्ट माहिती देणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

विशेष म्हणजे, स्वच्छतेसाठी प्रवाशांकडून स्वतंत्र अधिभार आकारला जात असेल तर त्यातून जमा होणाऱ्या निधीचा वापर नेमका कुठे आणि कशासाठी केला जातो, याची माहितीही सार्वजनिक करण्यात यावी, अशी अपेक्षा आहे. दररोज राज्यभरातील लाखो प्रवासी एसटीचा वापर करतात. प्रत्येक तिकिटावर दोन रुपये या प्रमाणात आकारणी होत असल्याने मोठ्या प्रमाणात निधी जमा होत असण्याची शक्यता आहे.

त्यामुळे या निधीची एकूण वसुली, वापर आणि त्यातून प्रवाशांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती एसटी महामंडळाने पारदर्शकपणे जाहीर करावी, अशी मागणी पुढे येत आहे.प्रवाशांच्या खिशातून नियमितपणे रक्कम घेतली जात असताना त्याबाबत स्पष्ट माहिती न देणे योग्य आहे का, असा सवालही उपस्थित होत आहे. स्वच्छता अधिभार आकारण्यामागील नियम, त्याचा उद्देश आणि निधीच्या वापराबाबत एसटी महामंडळाने प्रवाशांसमोर स्पष्ट भूमिका मांडण्याची गरज निर्माण झाली आहे.

## दुष्काळ जाहीर करण्यासाठी शिवसेनेचा एल्गार!

प्रतिनिधी २२ सप्टेंबर



**अकोला :** जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उपनेते तथा बाळापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात अकोला शहरात भव्य शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

जिल्ह्यातील विविध गावांमधून शेतकरी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाले होते. पावसाअभावी खरीप हंगामातील पिकांवर निर्माण झालेल्या संकटाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकऱ्यांनी या मोर्चाच्या माध्यमातून आपला आक्रोश व्यक्त केला. दुष्काळ जाहीर करा, शेतकऱ्यांना मदत द्या, अशा मागण्यांनी शहरातील वातावरण दणाणून गेले. या मोर्चात बैलगाडी आणि हातात घेतलेले सोयाबीनचे पीक हे विशेष आकर्षण ठरले. शेतकऱ्यांनी प्रतिकात्मक स्वरूपात बैलगाडी आणि सोयाबीनच्या पिकाच्या माध्यमातून शेतीसमोरील संकट प्रशासनासमोर मांडले. मोर्चात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह जिल्ह्यातील शेतकरी तसेच महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. त्यामुळे मोर्चाला मोठे स्वरूप प्राप्त झाले.

## न्यू इंग्लिशच्या कृपा सामानी हिला मल्लखांबचे सुवर्णपदक



प्रतिनिधी २२ सप्टेंबर

**अकोला:** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद व्दारा आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा मल्लखांब जय बजरंग हायस्कूल कुंभारी येथे येथे संपन्न झाल्या.

या स्पर्धेमध्ये न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय अकोल्याचे विद्यार्थिनी सहभागी झाल्या. कृपा ललित सायानी या विद्यार्थ्यांनीने १९ वर्षा आतील स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. तिचे प्राचार्य माधव मुनशी, उपमुख्याध्यापक उदय हातवळणे, पर्यवेक्षक प्रभारी अमोल बुटे, प्रा.नंदकीशोर थुटे, खंडारे, शाळेतील क्रीडा शिक्षक प्रभार व इतर विषय शिक्षक शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## लालबागच्या राजाची पोलीस अधीक्षकांच्या हस्ते आरती

### आर. आर. सी. ग्रुपचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख उपस्थित

प्रतिनिधी २२ सप्टेंबर





**अकोला:** लालबागच्या राजाची पोलिस अधीक्षकांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. या नयनरम्य सामूहिक आरतीला पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यासह आर. आर. सी. ग्रुपचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांच्यासह अनेक गणमान्य नागरिक उपस्थित होते.

अकोला शहरात गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असून, विविध मंडळांमध्ये आकर्षक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर अकोल्यातील लालबागच्या राजाची महाआरती अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडली. विशेष म्हणजे, या सोहळ्यात पोलीस अधीक्षकांच्या हस्ते लालबागच्या राजाची महाआरती करण्यात आली. या महाआरतीच्या वेळी उपस्थितांनी हातात दिव्यांची थाळी घेऊन केलेल्या सामूहिक आरतीचे एक अतिशय नयनरम्य आणि भारावून टाकणारे दृश्य पाहायला मिळाले. या धार्मिक व सोहळ्यात अकोला शहरातील अनेक प्रमुख गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विशेष कार्यक्रमात पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, आर. आर. सी. ग्रुपचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनीही उपस्थित राहून बाप्पाचे दर्शन घेतले आणि महाआरतीत सहभाग नोंदवला. लाडक्या बाप्पाच्या जयघोषाने आणि दिव्यांच्या प्रकाशाने संपूर्ण परिसर भक्तिमय आणि तेजोमय होऊन गेला होता.


शिवाय गणेशोत्सव मंडळ अकोट फाईल


दि ग्रेट मराठा गणेशोत्सव मंडळ महादेव संस्थान पंचमळी बाळापूर


जय हिंद गणेश उत्सव मंडळ नारायणपुरा बाळापुर


श्री गुरुकृपा गणेशोत्सव मंडळ रंगारहट्टी बाळापुर


शहीद चंद्रशेखर आझाद गणेश उत्सव मंडळ माळीपुरा


श्री महाभारत गणेश उत्सव मंडळ न्यू राधाकिसन प्लॉट


श्री शास्त्री नगर त्रिमूर्ती गणेशोत्सव मंडळ


श्री आझाद गणेश उत्सव मंडळ, राधे नगर


जय विदर्भ गणेशोत्सव मंडळ रंगारहट्टी बाळापुर


सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ तेलीपुरा कन्या शाळा बाळापूर


लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळ वाकडे चौक बाळापुर


श्री मोरेश्वर गणेश उत्सव मंडळ , मोरेश्वर कॉलनी अकोला

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135